अहवाल क्रमांक : १८०

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या भंडारा जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# पहिला अहवाल

(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या भंडारा जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# पहिला अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्ण धमाजी गजबे, वि.स.स.

(१६) डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर गजानन जोरगेवार , वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

## पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.

(८) ***रिक्त

(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) ***रिक्त

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) *श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पहिला अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबींसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ व सन २०१३-१४ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुर्नविलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने भंडारा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने भंडारा जिल्हा परिषदेस दिनांक १, २ व ३ ऑगस्ट, २०१८ रोजी भेट देऊन श्री.रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक ११ जून, २०१९ रोजी जिल्हा परिषद, भंडारा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्ष घेतली.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, डॉ.प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्रीमती विनिता सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.संतोषकुमार, व्य.सं.म.ल.ङ महामंडळ, श्री.म.र.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.कि.शां.परब, उप सचिव, जलसंपदा विभाग, डॉ.विजय बुंदेवार, सह संचालक, आरोग्य सेवा, श्री.राजाराम माने, विभागीय आयुक्त, नाशिक, श्री.यु.श्रीरंगम, सचिव तथा मु.का.अ. महा. इमारत व इतर बांधकाम मुंबई, श्री.विजयकांत पानबुडे, अप्पर कामगार आयुक्त, नागपूर, श्री.पुंडलिक मिराशे, सह सचिव, (तांत्रिक) म.प्र.न.मंडळ, श्री.विजयकुमार कलवले, सहायक संचालक, मृद व जलसंधारण विभाग, श्री.श.मा.साठे, उप सचिव, कामगार विभाग, डॉ. प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी, श्री.रमेश चव्हाण, उप सचिव, महसुल विभाग, श्री.रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, श्री.एल.एस.पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या भंडारा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | एक | शालेय पोषण आहार-राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रक्कम नियमबाह्य खर्च दर्शवून गंभीर अनियमितता केल्याबाबत (सन २०१२-१३). | ४.१०२/५८१ | १ |
| २ | दोन | प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार अंतर्गत लेख्यातील गंभीर अनियमितता (सन २०१२-१३). | ४.२४४/६४७ | ५ |
| ३ | तीन | सन २०१२-१३ या वर्षांत पंचायत समित्यामध्ये झालेल्या इतर इतर नियमबाह्य बाबी सन (२०१२-१३). | ४.४४२/७४१/७४९ | १३ |
| ४ | चार | लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत (सन २०१२-१३) | ३.६७५ | १६ |
| ५ | पाच | सर्वसाधारण शिफारशी | | २६ |
| | | **परिशिष्ट** | | |
| | | बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त | | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, भंडारा

### शालेय पोषण आहार योजना-राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रक्कम नियमबाह्य खर्च दर्शवून गंभीर अनियमितता केल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ४.१०२/५८१ (सन २०१२-१३)**

पंचायत समिती, पवनी यांनी शालेय पोषण आहार योजनेवर राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रुपये ३,८७,२७४ खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) शालेय पोषण आहार संबंधित १ ते ५ वर्गासाठी केंद्र हिस्सा ६ ते ८ वर्गाकरीता केंद्र हिस्सा तथा १ ते ५ करीता राज्य हिस्सा व ६-८ वर्गासाठी राज्य हिस्सा असे वेगवेगळे शहरी व ग्रामीण करीता अनुदान प्राप्त होत असताना केंद्र हिस्स्यात राज्य हिस्स्याचा समावेश करून देयक तयार करण्यात आलेले आहे. तथा नियमबाह्य देयके वित्त विभागाने आक्षेप न घेता रुपये ३,८७,२७४/- चे देयके पारित केले आहे.

(२) सदर देयकात मंजूर तरतुद ही प्राप्त तरतुद व शिल्लक अखर्चित अनुदान मिळून नोंदविलेली आहे. परंतु प्रत्यक्षात अखर्चित रक्कम चुकीची असल्याने देयकात नमूद तरतुद देखील चुकीची आहे. त्यामुळे प्रत्यक्षात अनुदान शिल्लक आहे किंवा नाही याचा बोध होत नाही.

(३) प्रत्यक्षात शाळेने मागणी केल्यानुसार देयक तयार करणे आवश्यक असताना मंजूर वाढीव दरानुसार देयके तयार केल्याने जादा रकमेचे शोधन झालेले आहे. तरी संबंधितांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त तरतुद राज्य हिस्सा रु. ३६,६४,४५५/- व केंद्र हिस्साची रु. ३२,०१,०१६/- प्राप्त झाली त्यानुसार शहरी व ग्रामीण भागाकरीता शालेय पोषण आहारासंबंधी १ ते ५ वर्गाकरीता व ६ ते ८ वर्गाकरीता राज्य हिस्सा खर्च करण्याचे निर्देश होते. त्यानुसार राज्य हिस्स्यात ३०,७६,३५४ व केंद्रामध्ये २९,१४,६०१ खर्च झाला. स्थानिक परिस्थिती लक्षात घेता भाजीपाला व इंधन देयक अदा करणे आवश्यक असल्यामुळे व माहे मार्च, २०१३ अखेर पर्यंत केंद्रहिस्स्याचे अनुदान प्राप्त होण्याची खात्री असल्याकारणाने शाळेचे इंधन व भाजीपाल्याचे ३,८७,२७४ रुपये देयक राज्याच्या शिल्लक रुपये ६,१८,०९१/- सदर रक्कमेतून देयक तयार करण्यात आलेले आहे.

सन २०११-२०१२ राज्य हिस्साची अखर्चित रक्कम रु. ३,५१,४५५/- व केंद्र हिस्साची अखर्चित रक्कम रु. ३,४५,०१६/- सन २०१२-२०१३ च्या प्राप्त तरतुदीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. सोबत खर्च नोंदवही क्र.२ च्या पान क्र. अनुक्रमे २६, २८, ३० व ३२ वर नोंद असून त्याची प्रत जोडलेली आहे.

सन २०१२-२०१३ मधील परिस्थिती लक्षात घेता आलेल्या अनुदानामधून तसेच शासन निर्णय दिनांक १७ ऑगस्ट, २०१२ अन्वये वाढीव दराने देयक तयार करून अदा करण्यात आलेले आहेत. शासनाच्या नियमांचे व अटीचे पालन करण्यात येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, केंद्र हिश्श्याची सर्व रक्कम केव्हा प्राप्त झाली, यावर अधीक्षक, पंचायत समिती, पवनी यांनी खुलासा केला की, या कार्य गटामध्ये केंद्रीय हिश्श्याची रक्कम होती ती राज्य हिश्श्यातून खर्च करण्यात आली होती. पडताळणी केली असता हे लक्षात आले की, चुकीची रक्कम दिली आहे. सन २०१८-१९ च्या लेखापरीक्षणामध्ये ३.८७ लाख रुपये एवढी रक्कम दिली असल्याचे नमूद आहे.

यावर समितीने विचारणा केली की, ही रक्कम पंचायत समिती सेस फंडाची होती का, यावर अधीक्षक, पंचायत समिती, पवनी यांनी खुलासा केला की, नाही. तत्कालिन अधीक्षक आणि गट शिक्षणाधिकारी आज उपस्थित नाहीत. त्यांना आम्ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीचे पत्र दिले होते. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शालेय पोषण आहाराची ही रक्कम तुमच्याकडे कुठून जमा झाली, यावर अधीक्षक, पंचायत समिती, पवनी यांनी खुलासा केला की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून जमा झाली.

यावर समितीने विचारणा केली की, केंद्रीय हिश्श्याची रक्कम राज्य हिश्श्यातून खर्च करण्याची परवानगी कोणी दिली, तत्कालिन अधीक्षकांनी परस्पर खर्च कसा केला, त्यामुळे जे उत्तर दिले आहे ते चुकीचे आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, हा खर्च पंचायत समिती स्तरावर झाला आहे.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हा विषय गांभीर्याने घ्यावा. केंद्रीय हिश्श्याची रक्कम आल्यानंतर तिचे पाच वर्षानंतर समायोजन केले जाते. या प्रकरणात सखोल चौकशी करावी, संबंधित अधिकारी सकृतदर्शनी दोषी असल्याचे दिसून येते. त्या पंचायत समितीला सहायक लेखा अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांचीही चौकशी करून संबंधित अधिकारी जर दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई करून एक महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. तसेच देयकावर तरतूद लिहिली होती, ती केंद्रीय हिश्श्याची नमूद केली आहे ते चुकीचे आहे. ती राज्य हिश्श्याची रक्कम होती. राज्य सरकारने ज्यांना अधिकार दिले ते आपल्या अधिकाराचा कसा दुरुपयोग करतात याचा हा नमुना आहे.

उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—

शालेय पोषण आहार योजना राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रक्कम नियमबाहय खर्च दर्शवून गंभीर अनियमितता झाल्याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार सबंधित अधिका-यांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे. नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—

पंचायत समिती, पवनी येथे शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सन २०१२-१३ मध्ये केंद्र हिश्याचे अनुदान अपुरे असल्याने राज्य हिश्यामधून रुपये ३,८७,२७४ इतकी रक्कम खर्च करण्यात आली होती. केंद्र हिश्याची खर्च केलेली रक्कम रुपये ३,८७,२७४ राज्य हिश्यातून पुढील आर्थिक वर्षात म्हणजे सन २०१३-१४ मध्ये समायोजित करणे अपेक्षित होते. तथापि, हे समायोजन त्या वर्षात न करता माहे जुलै, २०१८ मध्ये करण्यात आलेले आहे.

सदर बाबी करीता जबाबदार असलेले तत्कालिन गटशिक्षणाधिकारी श्री. एस. एच. तिडके हे दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी व तत्कालिन अधीक्षक (शापोआ) श्री. ए. एन. चांदेवार हे दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले असून त्यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :- जिल्हा परिषद, भंडारा यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सहमत आहे.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी माहिती दिली की, या प्रश्नामध्ये राज्य हिश्श्याची रक्कम केंद्र हिश्श्यामध्ये खर्च करण्यास वापरण्यात आली, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांनी चौकशी केलेली आहे. त्यामधील दोषींना कारणे दाखवा नोटीस देखील देण्यात आलेली आहे. तसेच सहायक लेखाधिकारी यांची वेतनवाढ थांबविण्याची कार्यवाही देखील त्यांनी केली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सहायक लेखाधिकारी यांची वेतनवाढ का थांबवली. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, समायोजन करायला हवे होते. सन २०१२-२०१३ चे अनुदान होते. पुढील वर्षात तरी समायोजन व्हायला हवे होते. यावर समितीने पुढे विचारणा केली की, नियमबाहय खर्च करण्याची परवानगी कोणी दिली होती.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, त्यामध्ये दोन हिस्से आहेत. यावर समितीने विचारणा केली की, राज्य हिस्सा अनुदानाच्या देयकातून केंद्र हिस्सा रक्कम नियमबाहय करण्यात आलेली आहे. ती कोणाच्या स्वाक्षरीने झाली होती, आदेश कोणी केला होता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्या आदेशान्वये हे झाले होते. राज्य हिस्सा किंवा केंद्र हिस्सा कधी कमी जास्त होतो. फक्त समायोजन करणे गरजेचे होते.

यावर समितीने विचारणा केली की, सहायक लेखाधिका-यांचे चुकले तेव्हा शिक्षणाधिका-याच्या लक्षात ही बाब आली असती तर तो कारवाईस पात्र झाला असता. खातेप्रमुखांकडून ती फाईल सादर करण्यात आली. त्यानंतर लेखा परिक्षण झाले, त्यानंतर तीन वेळा संधी दिली. त्या संधीमध्ये आक्षेप निकाली काढला नाही. पंचायती राज समितीपुढे हा आक्षेप आल्यानंतर सहायक लेखाधिका-यावर कारवाई करण्यात येते. मग खाते प्रमुख जबाबदार नाही का, यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, गटशिक्षणाधिकारी व शालेय पोषण

अधिक्षक या दोघांनाही कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून ते दोघेही सेवानिवृत्त झालेले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, सदरील आक्षेप निघाला तेव्हा ते सेवानिवृत्त होते काय. त्यांच्याकडे गटशिक्षणाधिका-याचा किंवा अधीक्षकाचा चार्ज त्यांच्याकडे होता काय, यावर संचालक, स्थानिक लेखा यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये सहायक लेखाधिकारी नसून अधीक्षक आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, या विषयी अनुपालन अहवाल कोणी सादर केला, शिक्षणाधिकारी प्राथमिक यांनी केला की गटशिक्षणाधिकारी यांनी केला. हा आक्षेप पंचायत समितीचा आहे की जिल्हा परिषदेचा आहे. यावर संचालक, स्थानिक लेखा यांनी खुलासा केला की, पंचायत समिती स्तरावर देयक अदा झाले आहे. सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, शिक्षणाधिकारी यांनी देयक अदा केले आहे.

यावर संचालक, स्थानिक लेखा यांनी माहिती दिली की, राज्य निधी गटशिक्षणाधिकारी स्तरावर शिल्लक होता. केंद्राचा नव्हता. यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी शिक्षणाधिकारी यांनी आदेश काढलेले आहेत. त्यांनी आदेश केल्यानंतर कनिष्ठ अधिका-यांनी देयक अदा केले आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, त्यांनी या निधीचे समायोजन पुढील आर्थिक वर्षामध्ये करायला पाहिजे होते ही त्यांची चुक झाली. निधी तेथे खर्च केला हा विषय नव्हता. सन २०१४-२०१५ मध्ये करण्याऐवजी सन २०१८ मध्ये करण्यात आले. या समायोजनाबाबत झालेल्या दिरंगाईबाबत करण्यात आलेली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, यामध्ये अधीक्षक दोषी दिसत आहेत. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यात हा निधी जमा होता. म्हणजे हा निधी जिल्हा परिषदेच्या खात्यात होता. जिल्हा परिषदेच्या खात्यावर पैसा असताना एका खात्यावरुन दुस-या खात्यावर निधी देताना जिल्हा परिषदेची मंजूरी घ्यावयाची होती. यास विषय समितीची मंजूरी घ्यावयास हवी होती. तद्नंतर समितीने विचारणा केली की, हा निधी जिल्हा परिषद स्तरावर होता की पंचायत समिती स्तरावर होता. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, राज्याचा हिस्सा म्हणून जिल्हा परिषदेने खाली निधी दिला आहे. खाली निधी देणे बरोबर आहे पण त्याचा वापर करताना या हिश्श्याच्या रकमेचा त्यांनी थोडा वापर केला आहे. कारण केंद्राच्या हिश्श्याचे पैसे आले नव्हते. यावर समितीने विचारणा केली की, केंद्र हिस्सा वापरण्याची परवानगी गटशिक्षणाधिकारी यांना कोणी दिली. यावर सह सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी खुलासा केला की, गट शिक्षणाधिकारी यांनी परवानगी दिली. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, शिक्षणाधिकारी सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. ते सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, त्यांच्यावर कारवाई करा असे समिती म्हणत नाही. पण कारवाई चुकली आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, कधी कधी विभागाला कनिष्ठ अधिका-यांवर कारवाई करावी लागते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पंचायती राज समितीला उत्तर देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी पात्र आहेत, खातेप्रमुख सुद्धा नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. त्यास प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग सहमत आहेत काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, अधिका-यांचे तसेच म्हणणे आहे, समितीने परवानगी दिली तर या चर्चेच्या अनुषंगाने पुन्हा पुर्नविचार करण्यात यावा की, खालच्या अधिका-यांवर जबरदस्तीने कारवाई केली असेल तर ती परत घेण्यात यावी. यावर समितीने विचारणा केली की, या विषयीची रक्कम किती कालावधीत खर्च करणे आवश्यक होते, व समायोजन करण्यास किती विलंब लागला. या प्रकरणामध्ये वेळोवेळी आवश्यक ती कार्यवाही केलेली नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, एखादी वस्तु १०० रुपयाची असताना केंद्र शासनाचे ६० रुपये येणार आहेत, ४० रुपये राज्य शासनाचे आहेत. वस्तु खरेदी करताना केंद्र शासनाचे ६० रुपये आले नाहीत, परंतु राज्य शासनाचे २०० रुपये पडून आहेत. ते तसेच पडून राहू नये म्हणून त्यांनी त्यातील १०० रुपये खर्च करून टाकले आहेत. पुढील समायोजनामध्ये ६० रुपये केंद्र शासनाचे दाखवून त्याचा हिशेब करून घ्यायला पाहिजे तो त्यावेळी केला नाही. ती जवळच्या आर्थिक वर्षाऐवजी तीन वर्षानंतर करण्यात आली. त्या यंत्राणेमध्ये जे लोक होते त्यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, सचिवांचे बरोबर आहे पण ते सर्व अगोदर केले पाहिजे होते. ते केले नाही. पंचायती राज समितीचे लेखापरीक्षण झाल्यानंतर कारवाई केली आहे. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, कारवाई केली आहे. पण सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांवर कारवाई केली नाही. यावर समितीने या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याचे निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-२०१३ मध्ये शालेय पोषण आहार योजना राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रक्कम नियमबाह्य खर्च दर्शवून गंभीर अनियमिततेप्रकरणी घेण्यात आलेल्या लेखा आक्षेपामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, पंचायत समिती, पवनी अंतर्गतवरील योजनेवर राज्य हिस्सा अनुदान देयकातून केंद्र हिस्सा रुपये ३,८७,२७४ एवढा खर्च झाला असून शालेय पोषण आहार संबंधित १ ते ५ वर्गासाठी केंद्र हिस्सा ६ ते ८ वर्गाकरीता केंद्र हिस्सा तथा १ ते ५ करीता राज्य हिस्सा व ६ ते ८ वर्गासाठी राज्य हिस्सा असे वेगवेगळे शहरी व ग्रामीण भागाकरीता अनुदान प्राप्त होत असताना केंद्र हिश्श्यात राज्य हिश्श्याचा समावेश करून देयक तयार करण्यात आलेले आहे. वित्त विभागाने आक्षेप न घेता रुपये ३,८७,२७४ एवढे देयक पारित केले आहे. अखर्चित रक्कम चुकीची असल्याने देयकात नमूद तरतूद देखील चुकीची आहे. त्यामुळे प्रत्यक्षात अनुदान शिल्लक आहे किंवा नाही याचा बोध होत नाही. शाळेने मागणी केल्यानुसार देयक तयार करणे आवश्यक असताना मंजूर वाढीव दरानुसार देयक तयार केल्याने जादा रकमेचे शोधन झालेले आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून लेखी खुलाशाद्वारे असे कळविले आहे की, सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त तरतूद राज्य हिस्सा रुपये ३६,६४,४५५ व केंद्र हिस्सा रुपये ३२,०१,०१६ प्राप्त झाला. त्यानुसार शहरी व ग्रामीण भागाकरीता वर्ग १ ते ५ व वर्ग ६ ते ८ करीता राज्य हिस्सा खर्च करण्याचे निर्देश होते. त्यानुसार राज्य हिश्श्यात रुपये ३०,७६,३५४ व केंद्रामध्ये रुपये २९,१४,६०१ खर्च झाले. भाजीपाला व इंधन देयक अदा करणे आवश्यक असल्यामुळे व माहे मार्च, २०१३ अखेरपर्यंत केंद्र हिश्श्याचे अनुदान प्राप्त होण्याची खात्री असल्यामुळे भाजीपाल्याचे रुपये ३,८७,२७४ एवढे देयक राज्याच्या रुपये ६,१८,०९१ शिल्लक रकमेतून तयार करण्यात आलेले आहे. सन २०११-२०१२ मधील राज्य हिश्श्याची अखर्चित रक्कम रुपये ३,५१,४५५ व केंद्र हिश्श्याची अखर्चित रक्कम रुपये ३,४५,०१६ सन २०१२-२०१३ च्या प्राप्त तरतुदीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दिनांक १७ ऑगस्ट, २०१२ अन्वये वाढीव दराने देयक तयार करून अदा करण्यात आलेले आहेत. सदर लेखी माहितीच्या अनुषंगाने साक्षी दरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पवनी पंचायत समितीमध्ये शालेय पोषण आहार योजनेसाठी आलेल्या केंद्रीय हिश्श्याची रक्कम राज्य हिश्श्यातून खर्च करण्यात आली असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये पडताळणी केली असता ही बाब निदर्शनास आली आहे. देयकावर तरतूद लिहिली असताना व केंद्रीय हिश्श्याची असल्याचे नमूद केलेले असताना रुपये ३,८७,२७४ इतकी रक्कम राज्य हिश्श्यातून खर्च करण्यात आली आहे. सदर रक्कम राज्य हिश्श्यातून पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच सन २०१३-२०१४ मध्ये समायोजित करणे अपेक्षित होते. तथापि, हे समायोजन त्या वर्षात न करता माहे जुलै, २०१८ मध्ये करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी तत्कालिन गट शिक्षणाधिकारी व अधीक्षक (शालेय पोषण आहार) हे अनुक्रमे दिनांक ३० एप्रिल, २०१७ व दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना कारणे दाखवा नोटीस दिनांक १८ जानेवारी, २०१९ रोजी देण्यात आलेली आहे. यावरुन असे दिसून येते की, आक्षेप निघाल्यानंतर त्याचवेळी उपरोक्त संबंधित गटशिक्षणाधिकारी व अधीक्षक (शालेय पोषण आहार) यांचेविरुद्ध कारवाई होणे अभिप्रेत असताना विलंबाने कारणे दाखवा नोटीस पाठविल्याचे दिसून येते. तसेच खर्च करण्यात आलेली रक्कम सन २०१३-१४ मध्ये समायोजित न करता माहे जुलै, २०१८ मध्ये समायोजन करण्यात आले आहे, त्यामुळे याप्रकरणी संबंधित अधिका-यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**प्रस्तुत प्रकरण हे शालेय पोषण आहार योजनेच्या राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाच्या रक्कमेच्या नियमबाह्य व चुकीच्या पद्धतीने खर्च केल्यासंबंधातील असून या प्रकरणी संबंधित जबाबदार अधिका-यांवर तात्काळ कारवाई होणे अपेक्षित असतानाही तशी कोणतीही कारवाई झालेली नसल्याची बाब समितीच्या निदर्शनास आलेली आहे. तसेच या प्रकरणामध्ये सहायक लेखाधिकारी यासारख्या अधिका-यांकडून चूक झाली तेव्हा शिक्षणाधिका-यांच्या ही बाब लक्षात आली असती तर सहायक लेखाधिकारी यांचेवर कारवाई करणे उचित ठरले असते. तथापि, खातेप्रमुखाकडून सदर प्रकरणाची नस्ती कोणतेही आक्षेप न काढता निकाली काढण्यात आल्यामुळे खाते प्रमुखांची जबाबदारी निश्चित करणे उचित होईल असे समितीचे स्पष्ट मत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी समितीने नोंदविलेल्या अभिप्रायानुसार संबंधिताची सखोल चौकशी करून त्यानुसार योग्य ती कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, भंडारा

### प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार अंतर्गत लेख्यातील गंभीर अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ४.२४४/६४७ (सन २०१२-१३)**

पंचायत समिती, पवनी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथे एकाच आर्थिक वर्षात दोन वेगवेगळ्या रोखवह्या ठेवून रुपये २,३१,५७४ ची अनियमितता केल्याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) प्राथमिक आरोग्य केंद्राचे रोख पुस्तकात दिनांक १ एप्रिल, २०१३ ची सुरूवातीची शिल्लक निरंक दर्शविलेली आहे. मात्र मागील लेखा परिक्षण सन २०११-१२ चे लेखा परिक्षण अहवालात दिनांक ३१ मार्च, २०१२ ची अखरेची शिल्लक रुपये ५४,९९५ आहे. सन २०१२-१३ चे लेखा परिक्षणात सादर करण्यात आलेल्या सन २०११-१२ चे रोख पुस्तकात अखेरची शिल्लक रुपये २,३१,५७४ निदर्शनास आले. परंतु वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असताना अभिलेख्यात सन २०११-१२ चे लेखा परिक्षण झाल्याबाबत रेखांकन तथा स्वाक्षरी आढळून आलेली नाही. यावरुन मागील लेखापरीक्षणात सादर केलेली रोख पुस्तके नक्कल असल्याचे स्पष्ट होत असून सदर रोख वहितील व्यवहार वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार यांनी प्रमाणित केलेले आहे. तसेच रोखवहित ब-याच ठिकाणी आकडेवारी नमूद नाही. तथा पांढ-या शाईचा वापर दिसून येतो. तरी एकाच वर्षात दोन वेगवेगळ्या रोखवह्या ठेवून शासनाची दिशाभूल केलेली आहे.

(२) सन २०११-१२ या वित्तीय वर्षाच्या दोन्ही रोखवहीत प्रत्येकी रुपये २,३१,५७४ तथा रुपये ५४,९९५ शिल्लक आहे. शिल्लकेसंबंधी रोखवहीत असंवितरीत रकमेचा गोषवारा नोंदविण्यात आलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे :—

प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथील कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांच्या अक्षम्य दुर्लक्षपणामुळे व चुकीमुळे रोकडवहीत खोडतोड व पांढ-या शाईने व जमा खर्चाचा व्यवस्थित हिशोब जुळत नसल्यामुळे रद्द करण्यात आली व तसे पत्र क्रमांक १४९/२०१२, दिनांक ३० मार्च, २०१२ ला जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना कळविण्यात आले व एकच रोकडवहीने संपूर्ण आर्थिक वर्षाचे स्थानिक निधी लेखा परिक्षण करण्यात आले. सन २०११-१२ ला स्थानिक निधी लेखा परिक्षण करणा-या चमुस सुद्धा हीच रोकडवही दाखविण्यात आली. सन २०११-१२ च्या स्थानिक निधी लेखाचा परिच्छेद क्रमांक ३९ नुसार दिनांक ३० मार्च, २०१२ अखेरची शिल्लक ५४,९९५ दाखविण्यात आली. त्याची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथे एकच रोकडवहीने व्यवहार सुरू आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथील कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांना कार्यालयीन दस्तऐवज व रोकडवही अद्ययावत न करणे या आरोपाखाली दोषी आढळल्यामुळे त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आलेली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे आदेश क्रमांक भंजिप/आवि/स्था-७६/वशि/१५७७/१२, दिनांक ३० मार्च, २०१२ अन्वये तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. सन २०११-१२ च्या रोकडवहीत लेखा परिक्षण चमुने रेखांकन तथा स्वाक्षरी केलेली आहे. रोकडवहीमध्ये ब-याच ठिकाणी खाडाखोड, उपरीलिखाण व पांढ-याशाईचा वापर केलेली व रद्द झालेली रोकडवहीमुळे कार्यरत श्री.ओ.सी.भोंडे, कनिष्ठ सहायक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथे एकच रोकडवही ठेवण्यात आलेली असून शासनाची कोणतीही दिशाभूल केलेली नाही. तसेच एकच रोकडवहीने संपूर्ण वर्षाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे.

सन २०११-१२ च्या परिच्छेद क्रमांक ३९ नुसार दिनांक ३० मार्च, २०१२ अखेरची शिल्लक ५४,९९५ दाखविण्यात आली आहे. रोकडवहीत शिल्लक असलेल्या रुपये ५४,९९५ असंवितरीत रकमेचा गोषवारा रोकडवही नमुना ४ पान क्रमांक ५५ वर नोंदविण्यात आलेला असून प्रमाणित करण्यात आलेला आहे. त्याची छायांकित प्रत संलग्न केलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, यामध्ये रोकडवही व्यवस्थित ठेवली नसलेल्या कनिष्ठ सहायकास दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी निलंबित केले आहे. त्यांच्यावर कोणती प्रशासकीय कार्यवाही केली आहे, शिल्लक रकमेचा गोषवारा केव्हा नोंदविण्यात आलेला आहे, सध्या शिल्लक रक्कम किती आहे व त्याचा गोषवारा सादर करण्यात यावा.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नोंदी न आढळून आल्यामुळे श्री. भोंडे यांना निलंबित केले आहे. दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थांबविण्यात आलेल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, या अधिका-यांवर कारवाई करण्याचे कारण काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, रोकडवही अद्ययावत न ठेवल्यामुळे कारवाई करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, रोकडवहीवर कोणाच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या होत्या. रोकडवहीवर वैद्यकीय अधिकारी यांची स्वाक्षरी असते. सदरहू लेखा आक्षेप हा प्राथमिक आरोग्य केंद्राचा आहे. असे असताना वैद्यकीय अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रमुखांवर कारवाई करण्याऐवजी कनिष्ठ लिपिकावर कारवाई करण्यात आलेली आहे. आर्थिक खर्च करण्याचे अधिकार वैद्यकीय अधिकारी यांनाच आहेत. याबाबतची जबाबदारी त्यांची आहे. दिनांक १८ ऑगस्ट, २००९ ते दिनांक ३० मे, २०१२ या कालावधीचा दुसरा अभिलेख तयार करण्यात आलेला आहे.

यावर वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, या कालावधीमध्ये त्यांची नुकतीच नियुक्ती झालेली होती. सन २००२ पासून श्री. ओ. सी. भोंडे हे कार्यरत होते. श्रीमती हिंगे यांच्या कार्यकाळामध्ये देखील अनेक गैरप्रकार करून चार-चार रोकडवह्या ठेवण्यात आलेल्या होत्या. ज्यावेळी श्रीमती हिंगे यांनी तेथील पदाचा कार्यभार स्वीकारला त्यावेळी त्यांना याबाबत पंचनामा करावा लागला होता. त्यामुळे त्यांना जवळपास एक वर्षभर त्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा कार्यभार मिळाला नव्हता. याबाबत त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अवगत करून तयार करण्यात आलेल्या चार-चार रोकडवह्या हस्तगत केल्या.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये चार-चार रोकडवह्या ठेवण्यात आल्या. सन २००२ पासून रोकडवहीमध्ये गैरव्यवहार केलेला आहे. त्याबाबतच्या नोंदी व्यवस्थित ठेवलेल्या नाहीत. या सर्व बाबी होत असताना संबंधितांना कोणी पाठीशी घातले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि इतर संबंधित अधिका-यांनी भेटी प्राथमिक आरोग्य केंद्राला दिल्या नाहीत काय, त्याचप्रमाणे वैद्यकीय अधिका-यांनी या गोष्टीकडे लक्ष द्यावयास पाहिजे. आर्थिक व्यवहारावर अंकेक्षण कोणाचे असते, त्या कालावधीमध्ये लेखा अधिकारी किंवा इतर संबंधित अधिका-यांनी त्या ठिकाणी भेट दिली नाही काय, तसेच कारवाई करण्यात आलेले कनिष्ठ लिपिक सध्या कार्यरत आहेत काय, यावर वैद्यकीय अधिकारी यांनी खुलसा केला की, सध्या त्यांच्या जागेवर दुसरे कनिष्ठ लिपिक आलेले आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, त्या कर्मचा-यावर कधी कारवाई केलेली आहे, यावर वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३० मार्च, २०१२ ला कारवाई करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सध्या त्यांची चौकशी सुरू आहे काय, यावर वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३० मार्च, २०१२ ला त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, रोकडवही सांभाळण्याची किंवा त्याचे जतन करण्याची जबाबदारी कोणाची आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लिपिकाने रोख पुस्तिका अद्ययावत करणे आवश्यक असते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, कनिष्ठ लिपिकांचे अधिकार काय आहेत, त्यांच्यावर वैद्यकीय अधिकारी यांची स्वाक्षरी असते. वैद्यकीय अधिका-यांच्या कक्षेमध्ये रोकडवही असते. यावर समितीने विचारणा केली की, परंतु अनेक ठिकाणी लिपिकच रोकडवही सांभाळत असतो. त्यांच्या नोंदी वैद्यकीय अधिकारी तपासत नाही. त्यामुळे ते लिपिकाच्याच कक्षेमध्ये असते. यावर समितीने विचारणा केली की, यासाठी सरकारने व्यवस्था निर्माण केलेली आहे. रोकडवही सांभाळण्याची जबाबदारी ही वैद्यकीय अधिका-यांची असते. जे अधिकार शासनाने दिलेले आहेत त्या अधिकाराची अंमलबजावणी केली पाहिजे. रोकडवही जर लिपिक सांभाळत असेल तर ते योग्य नाही. रोकडवहीवर वैद्यकीय अधिका-याच्या स्वाक्ष-या असतात. त्यानंतर ते त्यांनी त्यांच्या ताब्यामध्ये ठेवले पाहिजे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, वैद्यकीय अधिकारी रोकडवही त्यांच्या ताब्यामध्ये ठेवत नाहीत. ते लिपिकाच्याच ताब्यामध्ये ठेवले जाते. यावर समितीने विचारणा केली की, असा शासन निर्णय किंवा परिपत्रक असेल तर ते समितीला अवगत करून द्यावे. तसेच चेक बुक व रोकडवही हे वैद्यकीय अधिका-याकडे वा सक्षम अधिका-याकडेच ठेवण्याची व्यवस्था करावी. या प्रकरणातील चौकशी अधिकारी कोण आहेत, संबंधित कर्मचा-याची दोन वेतनवाढ का रोखण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदर प्रकरणी लिपिकांची वेतनवाढ रोखली त्याप्रमाणे वैद्यकीय अधिका-यांची वेतन वाढ का रोखली नाही, यावर सहायक आयुक्त (तपासणी) यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणाची विभागीय चौकशी केली जाते. चौकशी दरम्यान जे आरोप मांडलेले आहेत ते सिद्ध होतात की, नाही याची खात्री करून ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविले जाते. चौकशी प्राधिकरण हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे असल्यामुळे सदर आरोप मान्य करायचे की त्याच प्रकरणाची फेर चौकशी करायची हे त्यांनी ठरवायचे असते. यावर समितीने विचारणा केली की, ज्या रोकडवहीवर सक्षम अधिकारी स्वाक्षरी करतात, ती रोकडवही कोणाच्या ताब्यामध्ये राहणे आवश्यक आहे. यावर सहायक आयुक्त (तपासणी) यांनी खुलासा केला की, त्या विभागातील किंवा तेथील जो मुख्य अधिकारी आहे त्यांच्याकडेच रोकडवही राहणे आवश्यक आहे.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, असे असताना देखील हे अधिकारी लिपिकाकडे रोकडवही का ठेवतात, त्यांच्याकडे रोकडवही ठेवणे ही त्या वरिष्ठ अधिका-याची चूक असताना देखील लिपिकाची वेतनवाढ का थांबविण्यात आलेली आहे. यावर सहायक आयुक्त (तपासणी) यांनी खुलासा केला की, काही ठिकाणी अधिका-यांना किंवा कर्मचा-यांना वेगवेगळी कामे वाटून दिलेले आहेत. त्यामुळे कदाचित रोकडवही ठेवण्याचे काम त्या लिपिकाकडे असल्यामुळे सदर रोकडवही ही त्याच्याकडे दिली असेल.

यावर समितीने मत व्यक्त केले की, कार्यालय प्रमुखांनी स्वत:ची जबाबदारी कनिष्ठ अधिका-यावर टाकून त्यांच्यावर कारवाई करणे हे बरोबर आहे काय, यावर सहायक आयुक्त (तपासणी) यांनी खुलासा केला की, अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये जबाबदारी ही सर्वांवर सारखीच येईल. तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, असे असताना देखील फक्त लिपिकांवरच वेतनवाढीची कारवाई का करण्यात आलेली आहे, वैद्यकीय अधिका-यावर का कारवाई करण्यात आलेली नाही, यावर सहायक आयुक्त (तपासणी) यांनी खुलासा केला की, विभागीय चौकशीमध्ये चौकशी प्राधिकरणाने त्यांच्यावर आरोप मांडणे आवश्यक होते.

यावर समितीने विचारणा केली की, ही जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. अशा प्रकारचे आरोप वैद्यकीय अधिका-यांवर का लावले नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, प्रतिदिन लिपिक हा रोकडवही लिहून ती वैद्यकीय अधिका-याकडे देतो. त्यावर स्वाक्षरी करून ती रोकडवही ही परत लिपिकाकडे दिले जाते. पूर्वी तर रोकडवही ठेवण्यासाठी कॅशबॉक्स होते. त्याची एक चावी ही लिपिकाकडे राहत होती व एक चावी ही वैद्यकीय अधिका-याकडे राहत होती.

यावर समितीने विचारणा केली की, संबंधित लिपिकाने रोकडवही लिहून सहीसाठी वैद्यकीय अधिका-यांकडे दिली असताना त्या अधिका-याने पुन्हा रोकडवही लिपिकाकडे दिली यामध्ये वैद्यकीय अधिका-याची चूक आहे. असे असताना देखील लिपिकावरच वेतनवाढीची कारवाई का करण्यात आली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, वरिष्ठ अधिका-यानेच त्यांच्यावर आरोप लावल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. यावर वैद्यकीय अधिका-यांनी स्वतः त्यांच्यावर कारवाईची शिफारस केलेली आहे असे सांगितले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, भविष्यात आपण एखाद्या शिपायाकडे ही जबाबदारी देऊन त्यांनी चूक केली म्हणून त्यांच्यावर देखील कारवाई प्रस्तावित करू शकतात. अशा प्रकारची कारवाई करणे चुकीचे आहे. सदरहू रोकडवही तपासून स्वाक्षरी करणे हे वैद्यकीय अधिकारी यांचे काम आहे. सदर हिशोब चुकीचा केल्यामुळे त्या लिपिकावर कारवाई करणे हे चुकीचे आहे.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, रोकडवही ही वैद्यकीय अधिका-याच्या ताब्यामध्ये असते तर वेगवेगळ्या प्रकारच्या चार रोकडवह्या राहिल्या असत्या का, सदर प्रकरणी चूक कोणाची आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रकरणी वैद्यकीय अधिका-यांची चूक दिसून येत आहे. या प्रकरणी वैद्यकीय अधिका-यावर देखील आरोप ठेवता येतात. यावर समितीने विचारणा केली की, असे असताना त्यांच्यावर का आरोप ठेवण्यात आलेले नाहीत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये कोणकोणत्या अधिका-यावर आरोप निश्चित करायचे हे प्रशासनाने ठरविले पाहिजे. रोकडवही व चेक बुक हे त्या विभागातील मुख्य अधिका-याच्या ताब्यामध्ये राहणे आवश्यक आहे.

यावर समितीने विचारणा केली की, संबंधित लिपिकाने सदर प्रकरणी काय चूक केलेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, रोकडवहीमध्ये खाडाखोड करून १३ हजार रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. सदरहू १३ हजार रुपये हे त्यांच्या वेतनातून वसूल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थांबविण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकरण हे अतिशय गंभीर आहे. सदर प्रकरणी आरोग्य विभाग, ग्राम विकास विभाग आणि वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्याबाबत निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार अंतर्गत लेख्यासंदर्भात रोकड नोंदवहीत खाडाखोड केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :——**

प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार अंतर्गत लेख्यासंदर्भात रोकड नोंदवहीत खाडाखोड केल्याप्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे.

रोकड नोंदवहीत खाडाखोड केल्याप्रकरणी तत्कालिन कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे व तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. वैशाली एम. हिंगे या दोषी आढळून आल्या.

तत्कालीन कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांना निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली असून अफरातफरीची रक्कम चेक क्र.७५११७८ दिनांक २३ जानेवारी, २०१५ रुपये ५,०००, चेक क्र.८७५२८९ दिनांक ३० मार्च, २०१५ रुपये ५,००० आणि चेक क्र. ९०६२१३ दिनांक २९ एप्रिल, २०१५ रुपये ५,००० असे एकूण रुपये १५,००० वसूल करून शासन खाती जमा केली असून त्यांचेवर जा. क्र. भंजिप/आवि/स्था-७/वशि/१४३६/१६ दिनांक ०७ जुलै, २०१६ अन्वये दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी थांबविण्याची शिक्षा ठोठावण्यात आली.

तसेच डॉ. वैशाली हिंगे तत्कालीन वैद्यकीय अधिकारी यांचा विभागीय चौकशी करणेबाबतचा प्रस्ताव क्र.भंजिप/आवि/आस्था-१/५७९७/२०१८ दिनांक ३ जानेवारी, २०१८ अन्वये उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर यांना सादर केला आहे. तसेच या कार्यालयाचे अर्ध शासकीय पत्र क्र. भजिप/आवि/आस्था-१/५८०१/१८ दिनांक ३ फेब्रुवारी, २०१८ अन्वये डॉ.वैशाली हिंगे वैद्यकीय अधिकारी गट-अ प्रा. आ. केंद्र यांना तात्काळ निलंबीत करण्याबाबत विनंती केलेली आहे.

सबब अनुपालन अहवाल मान्यतेस्तव सादर.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**(१) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय.—** डॉ. वैशाली हिंगे, वैद्यकीय अधिकारी यांच्या निलंबनाच्या प्रस्तावावर त्यांच्या विरुद्ध दोषारोपाचे स्वरूप पाहता त्यांना निलंबीत न करता त्यांना सक्त ताकीद देण्याची शिफारस संचालक, आरोग्य सेवा मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनास केली होती. त्यानुसार डॉ. वैशाली हिंगे यांना सक्त ताकीद देऊन त्यांच्या सेवापुस्तकात नोंद घेण्याबाबत तसेच त्यांच्या कामकाजाचा अहवाल पाठविण्याबाबतच्या सूचना उप संचालक, नागपूर यांना संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक ७ जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये दिलेले आहे.

**(२) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (आस्था-७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी या प्रकरणी केलेल्या कारवाईस सहमती दर्शविण्यात येते.

**(३) वित्त विभागाचे अभिप्राय.—** अप्राप्त

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, रोकड नोंदवहीत खाडाखोड प्रकरणी चौकशी व कार्यवाही करण्यात आली आहे काय, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, समितीने भेट दिली तेव्हा निदर्शनास आले आहे की, रोखपालाकडे दोन रोकडवह्या होत्या. एका रोकडवहीमध्ये खाडाखोड केली होती, दुस-या रोकडवहीमध्ये तपासून त्याने लिहिले होते. एका रोकडवहीमध्ये वैद्यकीय अधिका-यांची सही होती तर दुस-या रोकडवही नव्हती. त्यांच्यावर कारवाई करून घेऊन १५ हजाराचा असलेला फरक वसूल करण्यात आला. त्यांच्या दोन वेतनवाढी थांबविण्यात आल्या. यामध्ये वैदयकीय अधिकारी यांची देखील जबाबदारी आहे असा विषय समोर आला. म्हणून त्यांना सक्त ताकीद दिली, त्यांची बदली केली, त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंदही घेतली आहे. वैद्यकीय अधिका-यांची तेथून नागपूर जिल्ह्यात बदली केली.

यावर समितीने विचारणा केली की, वैद्यकीय अधिका-यांना आस्थापनेची माहिती मिळण्यासाठी आपण प्रशिक्षण वर्ग घेता का, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी होकारार्थी उत्तर दिले, यावर समितीने विचारणा केली की, चौकशी अहवालात सांगितले आहे की, रोकड नोंदवहीत खाडाखोड केल्या प्रकरणी तत्कालीन कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांना निलंबित करून त्यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे, तसेच दोन वार्षिक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविण्याची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, सदरील कारवाई करण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, तसेच या अहवालात पुढे म्हटले आहे की, डॉ. वैशाली हिंगे तत्कालीन अधिकारी यांचा विभागीय चौकशी करण्याच्या प्रस्तावानुसार तुमच्या कार्यालयाचे अर्ध शासकीय पत्रानुसार गट-अ, वैद्यकीय अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत विनंती केली आहे. असे असताना नागपूर जिल्ह्यात त्यांची बदली केलेली आहे. कनिष्ठ सहायक श्री. भोंडे यांचा काय दोष आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, ते रोकडवही लिहित होते. यावर समितीने विचारणा केली की, रोकडवही लिहिणे हा विषय महत्वाचा नाही. प्राथमिक आरोग्य केंद्राचा आहरण व संवितरण अधिकारी वैद्यकीय अधिकारी आहे. रोकडवहीवर जो स्वाक्षरी करतो तो लिहितो असा त्याचा अर्थ आहे. कनिष्ठ सहायकाऐवजी वैद्यकीय अधिका-यावर कारवाई का केली नाही. कनिष्ठ सहायकाचे काम चांगले आहे म्हणून त्यावेळी त्याचा पगार मंजूर केला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, कनिष्ठ स्तरावर कोणाला तरी जबाबदारी द्यावी लागते.

यावर समितीने विचारणा केली की, त्यांनी डेली नोटीस कशा तपासल्या, तुम्ही वेतन देयके कशाच्या आधारे मंजूर करता. डीडीओने कनिष्ठ सहायकाच्या डेली नोटस तपासून पगार मंजूर केला असेल. त्याने त्यावेळी केलेले काम तपासले असेल. त्यावेळी तुम्हाला त्याची चूक का दिसली नाही. पंचायती राज समितीसमोर आल्यानंतर तुम्ही कारवाई करीत आहात. या प्रकरणी डीडीओ जबाबदार आहे, तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी जबाबदार आहे. कनिष्ठ सहायक रोकडवही लिहिण्यास पात्र आहे काय संचालकांनी सांगावे.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, रोकडवही लिहिणारा व डीडीओ या दोघांची रोकडवहीवर स्वाक्षरी असते. यावर समितीने मत व्यक्त केले की, कनिष्ठ सहायकाची सही रोकडवहीवर नसते, जो आर्थिक व्यवहार करतो तो रोकडवहीवर स्वाक्षरी करतो. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, डीडीओ प्रमाणित करतात पण वैद्यकीय अधिकारी यांनी जबाबदारी पार पाडली नाही.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, या कनिष्ठ सहायकावर पंचायती राज समितीच्या भेटीपूर्वीच सन २०१६ मध्ये कारवाई झालेली आहे. तेथील कनिष्ठ सहायक रोकडवहीचे काम करीत होता. यावर समितीने विचारणा केली की, वैद्यकीय अधिकारी यांना निलंबित करण्याचे आदेश समितीने दिलेले होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तसा प्रस्ताव पाठविला होता, पण त्यांची बदली झालेली आहे.

तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आरोग्य विभागास पत्र आले. त्यांनी दिलेल्या दोषारोपामध्ये प्राथमिक उपचार न करता त्या दुसरीकडे रुग्णांला संदर्भ देतात. आरोग्य केंद्रावरील कर्मचा-यामध्ये समन्वय न ठेवल्यामुळे प्रशासकीय नियंत्रण नाही. कर्मचा-यांना स्वतःच्या घरची कामे सांगणे, कर्मचा-यांना अपशब्द वापरून घालून पाडून बोलणे असे आरोप होते. यामध्ये आर्थिक अनियमितेबाबत कोणताही उल्लेख दोषारोप पत्रामध्ये नव्हता. याआधारे आयुक्तांनी आढावा घेतला, डीडीओ कार्यालयाचा अहवाल आर्थिक अनियमिततेबाबत नसल्यामुळे त्यांची बदली करावी, ताकीद द्यावी व सेवापुस्तिकेत नोंद घ्यावी.

यावर समितीने विचारणा केली की, श्री. भोंडे, कनिष्ठ सहायक यांची विभागीय चौकशी सुरू केली, त्यास निलंबीत केले. त्याच्याकडून वसूली केली हे चुकीचे आहे. वास्तविक डीडीओ वैद्यकीय अधिकारी आहे. कार्यासनानुसार वैद्यकीय अधिका-याची जबाबदारी व कनिष्ठ सहायकाची जबाबदारी याबाबत खुलासा करावा. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, संचालकांनी सांगितल्याप्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्रावर रोकडवही लिहिण्याची जबाबदारी कनिष्ठ सहायकाची आहे. यावर समितीने विचारणा केली की, डी.डी.ओ. रोकडवही लिहिणार नाही, तो केवळ स्वाक्षरी करेल असा शासन निर्णय असेल तर समितीस दाखविण्यात यावा. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, असे तांत्रिकरित्या सांगता येणार नाही. यावर समितीने विचारणा केली की, सचिवांनी तांत्रिकरित्या सांगावे असे समितीचे म्हणणे नाही. सचिवांनी कायदेशीररित्या सांगावे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, सध्या माहिती उपलब्ध नसल्यामुळे याचे उत्तर स्पष्टपणे सध्या देणे शक्य होत नाही.

यावर समितीने मत व्यक्त केले की, या विषयावर खुलासा मिळणे आवश्यक आहे. तसेच कनिष्ठ सहायकावर कार्यवाही का केली, हा दुसरा मुद्दा आहे. धोरणाप्रमाणे कार्यवाही होत नाही. रोकडवही करीत असताना खाडाखोड करण्यात आली. परंतु त्यावर डॉक्टरांची स्वाक्षरी असते, त्यावेळी त्यांनी दुरूस्ती करायला पाहिजे होती. वैद्यकीय अधिका-याने स्वाक्षरी करण्यापूर्वी रोकडवहीमध्ये खाडाखोड केलेली आहे किंवा कसे या बाबी तपासणे आवश्यक होते. त्यांनी त्याचवेळी दुरुस्ती किंवा सुधारणा का केली नाही. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, सचिवांनी साक्षीच्या अनुषंगाने संपूर्ण अभिलेखाची तपासणी केली. त्यातून आणखी एक मुद्दा उपस्थित झाला व त्याचीही वेगळी चौकशी विभाग करीत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून आयुक्त कार्यालयाला अहवाल प्राप्त झाला, त्याच्या दुस-याच दिवशी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सादर केला. मुख्य लेखा व वित्त अधिका-यांच्या या अहवालामध्ये २ लाख ३१ हजार ५७४ रुपयांचा फरक दाखविलेला आहे. सादर केलेले देयक संशयित आहे, तसेच खरेदीमध्ये काहीतरी चूक आहे. या प्रकरणाची वेगळी चौकशी करण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, कामाच्या तक्त्यानुसार कनिष्ठ सहायकाचे काम कोणते आहे ते सांगावे व कनिष्ठ सहायक, श्री. भोंडे हे दोषी कसे ठरविण्यात आले, याची माहिती द्यावी. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्रावर रोकडवही लिहिण्याची जबाबदारी सध्या कनिष्ठ सहायकाकडे देण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू डॉक्टरची बदली विनंती वरुन केली की, हा प्रकार झाल्यामुळे करण्यात आलेली आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, तेथील लोकांमध्ये व कर्मचा-यांमध्येही असंतोष होता. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर प्राथमिक आरोग्य केंद्र बदलून दिले होते. परंतु त्यानंतर त्यांची जिल्हा बदली करण्यात आली. यावर समितीने विचारणा केली की, निलंबनाचा प्रस्ताव कोणत्या स्तरावर आहे, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, तसा निलंबनाचा

प्रस्ताव नव्हता. विभागाकडे पाठविण्यात आलेले दोषारोप न तपासता उल्लेख करणे, समन्वय न ठेवल्यामुळे प्रशासकीय नियंत्रण नाही, ते अपशब्द वापरतात इत्यादी प्रकारचे आरोप नसल्यामुळे डीएचएसने जाणीवपूर्वक निर्णय घेऊन विभागाकडे प्रस्ताव सादर केला. त्यानंतर विभागाने संबंधितास ताकीद दिली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, रोकडवही लिहिण्याची जबाबदारी कनिष्ठ सहायकाचीच आहे काय, या समितीच्या प्रश्नाचा खुलासा झालेला नाही. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी माहिती दिली की, तसा उल्लेख कनिष्ठ सहायकाच्या जॉब कार्डमध्येही असेल. यावर समितीने विचारणा केली की, जॉब कार्डमध्ये तसा उल्लेख असेल तर दाखविण्यात यावा. यावर जिल्हा परिषद अधिकारी यांनी माहिती दिली की, प्राथमिक स्तरावर कनिष्ठ सहायकच रोकडवही लिहिण्याचे काम करतो. यावर समितीने मत व्यक्त केले की, जिल्हा परिषदेचे अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. कनिष्ठ सहायक अभिलेखे संभाळतो आणि तसे नसेल तर लेखी आदेश किंवा शासन निर्णय समितीस दाखविण्यात यावा.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, यासंदर्भात ग्रामविकास विभाग आणि वित्त विभागाचा सल्ला घेण्यात येईल व यामध्ये काय करता येईल, ते पाहिले जाईल. तसे पाहिले तर प्राथमिक आरोग्य केंद्रावर कर्मचारी वृंद अतिशय कमी आहे. तेथील डॉक्टर रूग्णांची तपासणी करतात की, यामध्ये प्रत्यक्ष अडचणी पाहणे महत्वाचे आहे. परंतु तरीही याबाबत आवश्यकता असल्यास ग्रामविकास विभाग आणि वित्त विभागाचाही सल्ला घेण्यात येईल.

यावर समितीने विचारणा केली की, संबंधित कर्मचा-याकडून खुलासा मागविला असेल. त्यावेळी त्यांनी खुलाशामध्ये नमूद करायला हवे होते की, ही माझी जबाबदारी नसून जबरदस्तीने काम सोपविण्यात आलेले आहे. याचाच अर्थ त्याची जबाबदारी होती. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्मचा-यांची संख्या कमी असते. हा विषय भंडारा जिल्ह्यातील या एकाच प्राथमिक आरोग्य केद्रापुरता मर्यादीत नाही. हा विषय महाराष्ट्रातील सर्वच प्राथमिक आरोग्य केद्रामधील आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या आर्थिक व्यवहाराच्या बाबींसंदर्भात आणि चेकवर स्वाक्षरी करण्यासाठी धोरण ठरविण्यात यावे.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, याला काही पर्याय नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये केवळ १५ जणांचा कर्मचारीवृंद आहे. कनिष्ठ सहायकाशिवाय तेथे कोणताही लिपिक नाही. डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, ब्लड टेक्नीशिअन आणि शिपाई असा १५ जणांचा कर्मचारीवृंद आहे. यांच्यापैकी रोकडवही कोण लिहिणार असा प्रश्न निर्माण होतो आणि त्यामुळे रोकडवही लिपिकलाच लिहावी लागू शकते. यावर समितीने मत व्यक्त केले की, नंतर आपण असे ही म्हणाल की, धनादेशा वर कनिष्ठ सहायकाने खोटी स्वाक्षरी केली. येथे ५ हजार रूपयांची अफरातफर दिसत आहे. हा धनादेश कोणी वटवला, यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, हा ५ हजार रूपयांचा फरक रोकडवही आणि बँक शिलकीमधील आहे.

यावर समितीने विचारणा केली की, परंतु आपण याची जबाबदारी कनिष्ठ सहायकावर निश्चित केली आहे. पैशाचे व्यवहार वैद्यकीय अधिका-यांनी केले आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी आणि कनिष्ठ सहायक यांच्यावर कारवाई करण्यास समितीची काही हरकतच नाही. आक्षेप आल्यानंतर जिल्हा परिषदेने कारवाई केल्याचे दिसत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भातील कार्यवाही सन २०१५ मध्येच झालेली आहे. दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी शिक्षा निश्चित झाली होती.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न भंडारा जिल्ह्यापुरता मर्यादीत असला तरी हा विषय संपूर्ण महाराष्ट्रामध्ये भेडसावत आहे. त्यामुळे याबाबत मार्गदर्शन तत्वे ठरणे आवश्यक आहे किंवा याबाबत परिपत्रक काढण्याची आवश्यकता आहे. हे परिपत्रक किंवा मार्गदर्शन तत्वे संपूर्ण जिल्ह्यामध्ये वितरीत करण्याची आवश्यकता आहे. आपण त्याबाबत चौकशी केली. तसेच कर्मचारी कमी असल्याची बाब खरी आहे. परंतु अशा प्रकरणामध्ये खालील अधिकारी भरडला जातो, हे उचित नाही. यासंदर्भात विभागाच्या मार्गदर्शन तत्वे ठरलेल्या नसल्यामुळे खालील कर्मचा-यांकडे काम सोपविले जाते.

यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, यामध्ये बहुतेक राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा निधी आहे. हे अभियान सन २००५ ते २००७ च्या सुमारास आले. त्यावेळी लिपिकास प्रोत्साहन देखील देत होतो. यावर समितीने विचारणा केली की, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे पैसे तालुका अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी या दोघांच्या स्वाक्षरीने वटविले जातात. असे असतानाही रोकडवहीवर दोघांच्याही स्वाक्ष-या लागतात. परंतु येथे कोणीच कसे पाहिले नाही, डोळे झाकून स्वाक्षरी केलेली आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी खुलासा केला की, तालुका आरोग्य अधिका-याची स्वाक्षरी रोकडवहीवर नसते. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर लिपिक स्वाक्षरी करतो. तसेच याबाबत विभागाकडे सध्यातरी पर्याय नाही. जिल्हा परिषदेच्या संघटना देखील आणखी मोबदला द्यावा, अशी मागणी करीत आहेत. माझी समितीला विनंती आहे की, या पद्धतीला सध्या चालू राहू द्यावे.

यावर समितीने निदेश दिले की, ही पद्धत चालू रहाण्यास समितीची हरकत नाही. जिल्हा परिषद व विभागाचे काम सुरू आहे. परंतु याबाबत कोणावर जबाबदारी निश्चित करायची तसेच सन्माननीय सदस्यांनी खाडाखोडीसंदर्भातील विषय उपस्थित केलेला आहे. ही बाब तपासून घेण्यात यावी. तसेच हा विषय संपूर्ण राज्याचा आहे. सचिवांची विनंती आहे की, कर्मचारी कमी असल्यामुळे ही प्रक्रिया अशीच

चालू राहिली पाहिजे. यामध्ये पारदर्शकता येण्याची आवश्यकता आहे. परंतु याबाबत विभागाने मार्गदर्शक सूचना किंवा टिप्पणी तयार करावी व ती वित्त विभागाकडे पाठविण्यात यावी. तसेच याबाबतचे अधिकार कोणाला द्यायला हवे याबाबत गाईड लाईन तयार करून पुढील कार्यवाही करावी. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायत समिती, पवनी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथे एकाच आर्थिक वर्षात दोन वेगवेगळ्या रोखवह्या ठेवून रुपये २,३१,५७४ एवढ्या रकमेची अनियमितता झाल्याप्रकरणी पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. रोख पुस्तकामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजीची सुरूवातीची शिल्लक निरंक दर्शविलेली आहे. मात्र दिनांक ३१ मार्च, २०१२ ची अखेरची शिल्लक रक्कम रुपये ५४,९९५ आहे. सन २०१२-२०१३ च्या लेखा परिक्षणात सादर करण्यात आलेल्या सन २०११-२०१२ च्या रोख पुस्तकात अखेरची शिल्लक रक्कम रुपये २,३१,५७४ असल्याचे निदर्शनास आले. सन २०११-२०१२ चे लेखा परिक्षण झाल्याबाबत रेखांकन तथा स्वाक्षरी आढळून आलेली नाही. सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षाच्या दोन्ही रोखवहीत प्रत्येकी रुपये २,३१,५७४ तसेच रुपये ५४,९९५ एवढी रक्कम शिल्लक आहे. शिल्लकेसंबंधी रोखवहीत असंवितरित रकमेचा गोषवारा नोंदविण्यात आलेला नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून कळविण्यात आलेल्या लेखी खुलाशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, भुयार येथील कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे व चुकीमुळे रोकडवहीत खोडतोड व पांढ-या शाईने व जमा खर्चाचा व्यवस्थित हिशोब जुळत नसल्यामुळे रद्द करण्यात आली व श्री.ओ.सी.भोंडे यांना कार्यालयीन दस्ताऐवज व रोख पुस्तिका अद्ययावत न ठेवणे या आरोपाखाली त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आलेली असून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांच्या दिनांक ३० मार्च, २०१२ रोजीच्या आदेशान्वये तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. अनियमितता झालेली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे त्यामुळे याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, रोखवहीमध्ये नोंदी आढळून न आल्याप्रकरणी कनिष्ठ सहायक श्री.ओ.सी.भोंडे यांना निलंबित करून त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी कायमस्वरुपी थांबविण्यात आलेल्या आहेत. वास्तविक रोखपुस्तिकावर वैद्यकीय अधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक असताना कनिष्ठ सहायकासारख्या पदावरील व्यक्तीविरुद्ध कारवाई करणे उचित नाही. सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एकापेक्षा जास्त रोकडवह्या ठेवण्यात आल्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि संबंधित अधिका-यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला नियमाप्रमाणे भेटी देऊन रोखपुस्तिकेतील नोंदी तपासणे आवश्यक होते. यापुढे धनादेश पुस्तिका व रोखपुस्तिका (रोकडवही) सक्षम अधिका-याकडे ठेवण्याची व्यवस्था करावी असे समितीचे मत आहे.

कनिष्ठ सहायकांनी रोखपुस्तिकेमध्ये खाडाखोड करून १३ हजार रुपयांचा अपहार केला असल्याचे जिल्हा परिषदेने सादर केलेल्या माहिती पुस्तिकेत नमूद केले असून त्यांच्याकडून १५ हजार रुपये वसूल करण्यात येऊन ते शासनाकडे जमा केल्याची बाब दिनांक ११ जून, २०१९ रोजीच्या समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तातून दिसून येते. वस्तुतः १३ हजार रुपयांचा अपहार झालेला असताना जिल्हा परिषद प्रशासनाने त्यांच्याकडून १५ हजार रुपये कोणत्या नियमानुसार वसूल केले याबाबत जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, ‘आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र भुयार येथील तत्कालिन निलंबित कनिष्ठ सहायक श्री. ओ. सी. भोंडे यांना निलंबीत करून त्यांची विभागीय चौकशी करण्यात आलेली होती व त्यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम रुपये १५,००० (अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) त्यांचेकडून डी. डी. क्र. ७५११७८ दिनांक २३ जानेवारी, २०१५, रुपये ५,००० (अक्षरी पाच हजार फक्त), डी.डी. क्र. ८७५२८९ दिनांक ३० मार्च, २०१५, रुपये ५,००० (अक्षरी पाच हजार फक्त) आणि डी.डी. क्र.९०६२१३ दिनांक २९ एप्रिल, २०१५, रुपये ५,००० (अक्षरी पाच हजार फक्त) असे एकूण रुपये १५,००० वसूल करण्यात आले. परंतु श्री. ओ. सी. भोंडे, कनिष्ठ सहायक यांचेकडून फक्त रुपये १३,३९३ (अक्षरी रुपये तेरा हजार तीनशे त्र्यान्नव फक्त) वसूल करणे आवश्यक होते. त्यामुळे रुपये १३,३९३ (अक्षरी रुपये तेरा हजार तीनशे त्र्यान्नव फक्त) शासन खाती भरणा करून उर्वरित रक्कम रुपये १६०७ (अक्षरी एक हजार सहाशे सात फक्त) शासन खाती भरणा करून उर्वरित रक्कम रुपये १६०७ (अक्षरी एक हजार सहाशे सात फक्त) चेक क्र. ०००३६ अन्वये श्री.ओ.सी.भोंडे, तत्कालिन कनिष्ठ सहायक, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना परत करण्यात आले आहेत.

यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ सहायकांनी रोखपुस्तिकेमध्ये खाडाखोड करून रुपये १३ हजार ३९३ एवढ्या रकमेचा अपहार केलेला असून सदर रक्कम कनिष्ठ सहायकांच्या वेतनातून वसूल करण्यात आलेली आहे व त्यांच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी थांबविण्यात आलेल्या आहेत. तत्कालिन वैद्यकीय अधिकारी या देखील दोषी आढळून आल्यामुळे सदर प्रकरण गंभीर आहे. तसेच तत्कालिन वैद्यकीय अधिकारी यांची विभागीय चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ३ जानेवारी, २०१८ अन्वये उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर यांना

सादर केला असून त्यांना तात्काळ निलंबित करण्याबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार नैसर्गिक न्याय तत्वानुसार चौकशी करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे याबाबतची माहिती समितीला दोन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

**प्रस्तुत विषय केवळ भंडारा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांपुरताच मर्यादित नसून तो संपूर्ण राज्यातील बहुतांश प्राथमिक आरोग्य केंद्राशी निगडीत आहे. वस्तुतः सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामधील रिक्त पदे वेळेत भरली जात नसल्यामुळे आवश्यक त्या मनुष्यबळाअभावी एकाच व्यक्तीवर दोन-दोन पदांचा कार्यभार सोपविण्यात येतो. परिणामी आरोग्य केंद्राच्या कामकाजावर त्याचा विपरीत परिणाम होतो. सदर प्रकरणी आर्थिक व्यवहाराच्या बाबीसंदर्भात आणि धनादेशावर स्वाक्षरी करण्यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाने धोरण निश्चित करावे. यामध्ये पारदर्शकता असावी व याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने मार्गदर्शक सूचना किंवा टिप्पणी तयार करून वित्त विभागाकडे पाठविण्यात यावी. तसेच याबाबतचे अधिकार कोणाला द्यायला पाहिजे याबाबत सुस्पष्ट मार्गदर्शक तत्वे तयार करून पुढील कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला दोन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, भंडारा

### सन २०१२-१३ या वर्षात पंचायत समित्यामध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ४.४४२/७४१/७४९ (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरूप | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १९ | अतिप्रदानाबाबत | भंडारा | पवनी | ७ | २८,५७६/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

**आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे :——**

जवाहर रोजगार योजनेअंतर्गत लाभार्थी श्री. भास्कर व्ही. भाजीपाले यांचे विहिरीचे अंतिम देयक प्रमाणक क्रमांक १२० दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२ अन्वये रक्कम रुपये २८,५७६ चे देयक पारित करण्यात आले. परंतु धनादेश लिहिताना नजरचुकीने रक्कम रुपये ५०,३७५ चा धनादेश लिहून लाभार्थ्यास प्रदान करण्यात आला. त्यानंतर संबंधित लाभार्थी मृत पावल्यामुळे त्यांचे वारसांना पत्रव्यवहार करून अतिप्रदान रक्कम जमा करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार संबंधित लाभार्थ्यांच्या वारसाकडून रुपये २१,७९९ पैकी चलान क्रमांक २३ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ अन्वये रुपये १०,००० व चलान क्रमांक २ दिनांक १९ डिसेंबर, २०१४ अन्वये रुपये ३,००० तसेच चलान क्रमांक निरंक दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ अन्वये रुपये १,५९९ व चलान क्रमांक २७ दिनांक ७ मार्च, २०१७ अन्वये रुपये २,००० आणि चलान क्रमांक ४० दिनांक १२ डिसेंबर, २०१७ अन्वये रुपये ५,२०० असे एकूण अतिप्रदान रुपये २१,७९९ अभिकरण योजना खाते क्रमांक ६ मध्ये जमा करण्यात आले आहे.

आक्षेपात नमूद अतिप्रदानाची रक्कम ही रुपये २८,५७६ नसून रुपये २१,७९९ आहे. सोबत चलनाच्या प्रती संलग्न केलेल्या आहेत. कृपया खुलासा मान्य करण्यात यावा ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक १ ऑगस्ट, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अतिप्रदान रक्कम रुपये २१,७९९ वसूल करण्यात आली आहे काय, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांनी खुलासा केला की, एक लाभार्थी श्री.भाजीपाले होते, त्यांचे देयक रुपये २१,७९९ रक्कमेचे मंजूर झाले. परंतु रोकडवहीमध्ये दुस-या लाभार्थीचे रुपये २८,५०६ चे देयक मिळून ५० हजार रुपयांचा चेक लिहिला होता. यावर समितीने विचारणा केली की, मागील एका प्रकरणात अभिलेख लिहिला नाही त्यामुळे त्यांना सेवेतून निलंबित केले. ज्यांनी एवढी मोठी चूक केली त्यांच्यावर कारवाई का केली नाही, तसेच याबाबत पैसे जमा केले का, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांनी खुलासा केला की, १०० टक्के वसूली केली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, ही चूक लेखापरीक्षण आक्षेप आल्यानंतर लक्षात आली. ज्यांनी चूक केली त्यांच्यावर कारवाई करावी. तसेच सन २०१२-१३ चा आयुक्त कार्यालयाचा तपासणी अहवाल मागवावा. सहायक आयुक्तांकडे त्या अहवालाची प्रत आहे का, यावर सहायक आयुक्त यांनी खुलासा केला की, अहवाल आणलेला नाही. सदरहू अतिप्रदान वसूलीचा मुद्दा आहे.

यावर समितीने पुढे विचारणा केली की, विभागीय आयुक्त कार्यालयाकडून जिल्हा परिषदेची पाहणी केली जाते. मुद्देनिहाय पाहणी केली तर आक्षेप येणार नाही, चुका होणार नाहीत. सन २०१२-१३ या वर्षात आयुक्त कार्यालयाने तपासणी केलेल्या अहवालाची प्रत समितीला द्यावी. तपासणीमध्ये कोणत्या चुका आढळून आल्या हे त्या अहवालामध्ये पाहता येईल.

यावर सहायक आयुक्त यांनी खुलासा केला की, सन २०१२-१३ मध्ये ११३ आक्षेप आयुक्त कार्यालयाने काढले होते. लेखापरीक्षणाच्या संदर्भात हे आक्षेप असतात. मागील वर्षी झालेल्या लेखापरीक्षणामधील गंभीर मुद्दे मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे पाठवितो किंवा मेमो रिडिंगमध्ये घेतो. सन २००१ पासून २०१७ पर्यंत जे आक्षेप घेतले होते त्यात २१०१ मुद्यांचे आयुक्त कार्यालयाने अनुपालन करण्यास सांगितले आहे. मागील तीन वर्षात त्यांनी अनुपालन सादर केलेले आहेत. आयुक्त कार्यालय सतत पाठपुरावा करीत असते, अर्धशासकीय पत्र पाठविली जातात. मी स्वतः जिल्हा परिषदेमध्ये येऊन बसलो होतो. ४९१ मुद्यांबाबत अनुपालन कागदपत्रे त्यांनी दिलेली आहेत. यापेक्षाही गंभीर स्वरुपाच्या आर्थिक अनियमिततेच्या चौकशीबाबत आयुक्त कार्यालय पाठपुरावा करीत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ मध्ये जे मुद्दे काढले ते या लेखापरीक्षण आक्षेपामध्ये पुन्हा झाले आहेत का, यावर सहायक आयुक्त यांनी सदरहू बाब तपासून माहिती देतो असे समितीस सांगितले. यावर समितीने मत व्यक्त केले की, सहायक आयुक्त आणि लेखापरीक्षा विभागाचे मुद्दे एकसारखे असतील तर जिल्हा परिषदेचे अधिकारी जाणुनबुजून चुका करतात हे सिध्द होते. हे पाहण्याची जबाबदारी ग्रामविकास विभागाची आहे. तसेच पवनी पंचायत समितीमध्ये जे अतिप्रदान झाले त्या संदर्भात कनिष्ठ लिपिकाची जबाबदारी निश्चित करून निधीचे नियोजन केले पाहिजे होते. तसे न करता अतिप्रदान झालेले आहे. ज्यांनी पैसे घेतले ती व्यक्ती मयत झाली असून त्यांच्या कुटुंबाला पत्र दिल्यानंतर त्या कुटुंबाने प्रामाणिकपणे ती रक्कम परत केली आहे. परंतु लेखापरीक्षणात ही बाब उपस्थित झाली नसती तर हा शासनाचा निधी बुडाला असता. विभागाच्या कनिष्ठ लिपिकाने पाहणी केली नाही. अशा बेजबाबदारपणे काम करणा-या बी.व्ही.थेंडर, कनिष्ठ लिपिक व इतर संबंधित अधिका-यांना कळले पाहिजे की, जिल्हा परिषदेमध्ये काम करीत असताना निधीच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता ठेवली पाहिजे. शासनाच्या माध्यमातून येणारा निधी हा जनतेचाच पैसा असतो, त्यात गैरव्यवहार होत असेल तर संबंधित कर्मचारी कारवाईस पात्र ठरतात.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जवाहर रोजगार योजनेंतर्गत लाभार्थींना विहीरीचे अंतिम देयक या आक्षेपात नमूद अतिप्रदानाच्या रक्कमेच्या वरच्या आणि खालच्या बेरजेमध्ये चूक झाली आहे. यावर समितीने निदेश दिले की, जिल्हा परिषदेच्या अधिका-यांनी याबाबत काहीही पाहिले नाही. लेखापरीक्षणामध्ये आक्षेप आल्यामुळेच ही बाब उघडकीस आली. त्यामुळे या प्रकरणात चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी आणि त्याबाबत कारवाईसह अहवाल समितीला सादर करावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :-**

सन २०१२-१३ या वर्षात पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबधीतांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. पंचायत समिती, पवनी अंतर्गत सिंचन विहिरीची अतिप्रदान झालेली एकूण रक्कम रुपये २१,७९९ होती.

सदर अतिप्रदान झालेली रक्कम खालीलप्रमाणे,—

(१) चलन क्र. २३, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ ला रुपये १०,०००/-,

(२) चलन क्र. २, दिनांक १९ डिसेंबर, २०१४ ला रुपये ३,०००/-,

(३) चलन क्र. २०४/६, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ ला रुपये १५९९/-,

(४) चलन क्र. २७१, दिनांक ७ मार्च, २०१७ ला रुपये २०००/-,

(५) चलन क्र. ४०, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ ला रुपये ५२०० द्वारे वसूल करण्यात आलेली आहे.

अतिप्रदानाकरिता जबाबदार श्री. व्ही.बी.फेंडर, तत्कालिन कनिष्ठ सहायक (लेखा) यांची कार्यालयाचे आदेश क्र. भंजिप/वित्त/आस्था-७/१००८/१९, दिनांक २१ जानेवारी, २०१९ अन्वये व श्री. ए. एस. लांजेवार, तत्कालिन सहायक लेखा अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांची आदेश क्र. भंजिप/वित्त/ आस्था-७/१००९/२०१९, दिनांक २१ जानेवारी, २०१९ अन्वये एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्यात आली आहे. तसेच विस्तार अधिकारी (पंचायत) तथा प्रभारी गट विकास अधिकारी श्री. साळवे हे दिनांक ६ जुलै, २०१६ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना पत्र क्र. ३५२/१९, दिनांक २३ जानेवारी, २०१९ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. नियमाप्रमाणे त्यांच्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सबब अनुपालन अहवाल मान्यतेस्तव सादर.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.—** (आस्था-७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी केलेल्या कारवाईस सहमती दर्शविण्यात येते.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी

माहिती दिली की, मागील काळात जिल्हा परिषदेने या विषयाची चौकशी केली होती. यामध्ये एकाच व्यक्तिला दोनदा देयक अदा केले होते. म्हणजे २५ हजार रुपयांच्या ऐवजी ५० हजार रुपयांचा धनादेश अदा केला होता. नंतर टप्प्याटप्प्याने त्या व्यक्तिकडून त्याची वसूली केली. यात जो व्यक्ति दोषी होता त्याला कारणे दाखवा नोटीस देऊन त्याच्यावर काही कारवाई केलेली आहे.

यांनतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ज्या व्यक्तिला आगाऊचे पैसे गेले होते त्यांच्याकडून ते वसूल करण्यात आले आहेत आणि ज्यांच्या चुकीमुळे हा विषय निर्माण झाला त्यांची एक वेतनवाढ थांबवण्यात आली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-२०१३ या वर्षात पवनी पंचायत समितीमध्ये नियमबाह्य अतिप्रदान करण्यात आले. सदर पंचायत समितीमार्फत रुपये २८ हजार ५७६ एवढ्या रक्कमेचे देयक पारित करण्यात आले. या प्रकरणी भंडारा जिल्हा परिषदेकडून कळविण्यात आलेल्या लेखी खुलाशानुसार जवाहर रोजगार योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या विहीरीचे रुपये २५ हजार ५७६ एवढ्या रक्कमेचे अंतिम देयक दिनांक ३ ऑक्टोबर, २०१२ रोजी देयक पारित करण्यात आले. परंतु धनादेश लिहिताना नजरचुकीने रुपये २५,५७६ ऐवजी रुपये ५०,३७५ एवढ्या रकमेचा धनादेश लिहून लाभार्थ्यास प्रदान करण्यात आला. त्यानंतर संबंधित लाभार्थी मृत पावल्यामुळे त्यांचे वारसांना पत्रव्यवहार करून अतिप्रदान रक्कम जमा करण्याबाबत कळविले. त्यानुसार लाभार्थ्यांच्या वारसाने अतिप्रदान केलेली रक्कम रुपये २१ हजार ७९९ अभिकरण योजना खाते क्रमांक ६ मध्ये जमा करण्यात आले आहेत. आक्षेपात नमूद अतिप्रदानाची रक्कम रुपये २८ हजार ५७६ नसून रुपये २१ हजार ७९९ एवढी आहे.

उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने भंडारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, लाभार्थ्याला अतिप्रदान करण्यात आलेली रक्कम रुपये २१ हजार ७९९ वसूल करण्यात आलेली आहे. त्यामुळे १०० टक्के वसूली केली आहे. तथापि, पवनी पंचायत समितीमध्ये जी रक्कम अतिप्रदान झालेली आहे. त्यासंदर्भात कनिष्ठ लिपिकाची जबाबदारी निश्चित करून निधीचे नियोजन केले पाहिजे होते तसे न अतिप्रदान झालेल्या लाभार्थी मयत झाल्यानंतर त्याच्या कुटुंबाला पत्र दिल्यानंतर त्या कुटुंबाने प्रामाणिकपणे ती रक्कम परत केली आहे. परंतु लेखापरीक्षणात ही बाब उपस्थित झाली नसती सदर अतिप्रदान झालेला शासनाचा निधी बुडाला असता विभागाच्या कनिष्ठ लिपिकाने पाहणी केली नाही अशा बेजबाबदारपणे काम करणा-या तत्कालिन कनिष्ठ लिपिक व इतर संबंधित अधिका-यांनी जिल्हा परिषदेमध्ये काम करीत असताना निधीच्या व्यवहारामध्ये पारदर्शकता ठेवणे आवश्यक होते. शासनाच्या माध्यमातून येणारा निधी हा जनतेचाच पैसा असतो त्यामध्ये गैरव्यवहार होत असेल तर संबंधित कर्मचारी कारवाईस पात्र ठरतात. लेखापरीक्षणामध्ये आक्षेप आल्यामुळे सदर बाब निदर्शनास आली आहे. **अतिप्रदानाकरीता जबाबदार तत्कालिन कनिष्ठ सहायक (लेखा) व तत्कालिन सहायक लेखा अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांची दिनांक २१ जानेवारी, २०१९ अन्वये एक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरूपात थांबविण्यात आली आहे. तसेच तत्कालिन विस्तार अधिकारी (पंचायत) तथा प्रभारी गटविकास अधिकारी हे दिनांक ६ जुलै, २०१६ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना दिनांक २३ जानेवारी, २०१९ अन्वये कारणेदाखवा नोटीस बजावण्यात आली आहे, त्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, भंडारा

### लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ३.६७५ (सन २०१२-१३)**

**५०% अनुदानावर शेतकरी लाभार्थ्यांना ताडपत्री वाटपातील अनियमितता :**

(१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/१०८४/६४६/२६६/३४, दिनांक २९ जुलै, १९८९ नुसार राबविण्यात येणा-या योजनेचे फलश्रृती अहवाल मूल्यमापन केल्याचे आढळत नाही.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास १०९३/प्र.क्र.१२९३/३४, दिनांक १ सप्टेंबर, १९९३ नुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करावयाचे असताना वाटप केल्याची खात्री होत नाही. तसेच लाभार्थ्यांचे ताडपत्री प्राप्त झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

(१) राबविलेल्या योजनेचे मूल्यमापन केले असून फलश्रृती व मूल्यमापन अहवाल या सोबत जोडण्यात येत आहे.

(२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे आदेश क्र. ५००अ/१३, दिनांक ३० मार्च, २०१३ ला महाराष्ट्र राज्य लघुउद्योग विकास महामंडळ, भंडारा यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. पुरवठा आदेशानुसार साहित्य दिनांक ३१ मार्च, २०१३ ला माल पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाल्याने लाभार्थ्यांना दिनांक ३१ मार्च, २०१३ नंतर वाटप झालेले आहे. याबाबत पंचायत समिती माल प्राप्त झालेबाबत पोचपावतीची प्रत वाटप झालेबाबत स्टॉक बुकची प्रत जोडण्यात आली आहे. लाभार्थ्यांना ताडपत्री प्राप्त झालेबाबत उपयोगिता प्रमाणपत्र जोडण्यात येत आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.६७६ (सन २०१२-१३)**

**राज्य पुरस्कृत मिरची पिक सन २०१२-१३ करीता पिक संरक्षण मोहीम अंतर्गत किटक नाशकाचा/बुरशी नाशकाचा पुरवठा करणेबाबत :**

कृषी विभाग जिल्हा निधी या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये रुपये ८५,४२८ खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक सीपीएस/किमा-दर/२०१२-१३/१२७ गुणि-५/२०१२, दिनांक २५ मे, २०१२ नुसार कृषी विकास अधिकारी यांच्याकडे पंचायत समिती लाभार्थी हिश्याची रक्कम जमा करावी व कृषी विकास अधिकारी यांनी सदर रक्कम ३० दिवसांत पुरवठा संस्थेत पुरवठा धारकास जमा करणे आवश्यक होते तसे केलेले नाही. पंचायत समिती निहाय उपयोगिता प्रमाणपत्र लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याबाबत अहवाल व मूल्यांकन अहवाल उपलब्ध झाला नाही. किटकनाशक/बुरशीनाशक उचल करण्यासाठी शेतक-यांना देण्यात आलेले परवानापत्रे लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. लाभार्थी हिस्सा कृषी विकास अधिकारी यांच्याकडे जमा झाल्याबाबत अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

पंचायत समिती निहाय उपयोगिता प्रमाणपत्र लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झालेबाबत अहवाल व मूल्यांकन अहवाल या सोबत जोडण्यात येत आहे. किटकनाशके/ बुरशीनाशके महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ कडून पुरवठा झाला होता. लाभार्थीची निवड केली होती व त्याकरीता विभागाच्या गोदामातून यांचे वितरण केले होते. त्यामुळे परवानापत्रे शेतक-यांना देण्यात आलेली नव्हती.

लाभार्थी हिस्सा संबंधित संस्थेस देणेत आलेबाबत पुरवा या सोबत जोडण्यात येत आहे.

शेतक-यांना ग्रामसेवक/कृषी सहायक यांचे दाखले व ७/१२ वर नमूद शेती पिकानुसार दिलेले आहे. लाभार्थी हिस्सा संबंधित संस्थेस देणेत आलेबाबत पुरावा या सोबत जोडण्यात येत आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (५३१) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :**

**जिल्हा वार्षिक योजना.—** कामाचे प्राकलन अप्राप्त असताना अनुदानाचे वाटप करणे, खर्चाचा अहवाल कामपूर्ण प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणपत्र अप्राप्त असणे.

तात्पुरती अमान्य रक्कम रुपये ८,००,०००/-

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

**प्रशासकीय मंजुरी.—** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचे आदेश क्र. २३ दिनांक १ जानेवारी, २०१२ रुपये १० लक्ष (आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.)

**अनुदान वितरण आदेश.—** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचे आदेश क्र. २४१ दिनांक १६ जानेवारी, २०१३ रुपये ८ लक्ष (आदेशाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.)

सदर आदेशात जकातदर माध्यमिक विद्यालय, भंडारा येथे इमारत बांधकाम विशेष दुरुस्तीकरिता ४.०० तसेच माजी शासकीय लाल बहादुर शास्त्री माध्यमिक शाळा, भंडारा येथील सभागृह दुरुस्तीकरिता रुपये ४.०० प्रमाणे एकूण ८.०० लक्ष अनुदान कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सुपूर्द करण्यात आले.

सदर शाळेचे विशेष दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले असून प्रशासकीय मान्यता ही कार्यकारी अभियंता (सा.बां.), जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सादर करण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने अंदाजपत्रक तयार करून कामे पूर्ण केलेली आहे :

परंतु लेखा परिक्षणाच्या वेळेस काही तांत्रिक कारणामुळे प्राकलन, खर्चाचा अहवाल काम पूर्ण प्रमाणपत्र, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही, करीता जकातदर माध्यमिक विद्यालय, भंडारा येथे इमारत बांधकाम विशेष दुरुस्ती व माजी शासकीय लाल बहादुर शास्त्री माध्यमिक शाळा, भंडारा येथील सभागृह दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून त्यानुसार प्राकलन, खर्चाचे अहवाल काम पूर्ण प्रमाणपत्र उपयोगिता प्रमाणत्रासोबत जोडण्यात आलेले आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र.१४३४ दिनांक ३१ मार्च, २०१८ अन्वये स्थानिक निधी लेखा कार्यालय, भंडारा यांना सदर अभिलेख्याचे लेखा परिक्षण करण्याबाबत विनंती केली आहे. तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(४) परिच्छेद क्रमांक ४.१८२/६१८ (सन २०१२-१३)**

**जांब येथील सिमेंट रोड बांधकामातील अनियमिततेबाबत (हस्तांतरित योजना)**

सिमेंट रोड बांधकामावर रुपये ५,००,००० इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ११४ नुसार १०% हून अधिक किंवा रुपये १०,०००/- यातील लहान असेल अशा रकमेने मूळ अंदाजपत्रक वाढविण्याची शक्यता असेल तर सुधारित अंदाज व नकाशे तयार करणे आवश्यक असताना बाब १:३:६ वर रुपये ४१,६४६/- व M-२० वर रुपये ४०,१०७/- जास्त खर्च केल्याचे आढळून येते.

(२) प्राकलनामध्ये वेगवेगळ्या बाबींवर रक्कम रुपये ४७,७७३/-, ८,६४०/- १२,८७९/-, ६५५/- ६,५१९/- तरतूद केली असताना मोजमाप पुस्तिकेत वरील बाबींचे मोजमाप केले नाही. त्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ नियम १५२ (१) व १५२ (२) अन्वये मंजूर प्राकलनाप्रमाणे काम करताना सुधारित प्राकलन केले नाही व त्यास नियम १५० नुसार तांत्रिक मान्यता व १५१ नुसार प्रशासकीय मान्यता घेतली नाही.

(३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौणखनिज/१०/१००९/ प्र.क्र. ३०९/मंत्रालय मुंबई दिनांक ११ फेब्रुवारी, २०१० नुसार रॉयल्टी प्रती घनमीटर रुपये ७०.७० प्रमाणे एकूण १६७ घनमिटरचे रुपये ११,८०७/- वसूलपात्र ठरते.

(४) मोजमाप पुस्तिकेत वॅट : रुपये २५,०००/- विमा : रुपये ५,०००/- उपकर : रुपये ५,०००/- कपाती दाखविल्या आहेत. पण प्रत्यक्षात लेखा विभागाने सदर कपाती लेखा परिक्षण कालावधीपर्यंत शासन खाती चलनाद्वारे जमा केल्या नाहीत.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १६८ नुसार कामाची तपासणी उप अभियंता यांनी १०% व कार्यकारी अभियंता यांनी ५% केल्याचे दिसून येत नाही.

(६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/२०००/ प्र.क्र.१५६/पं.रा./०८ दिनांक २९ जानेवारी, २००४ अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत स्थावर/जंगम मालमत्ता नोंदवहीत नोंद घेतल्याचे अभिलेखे उपलब्ध आहेत.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

मुलभूत सुविधा लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गाव अंतर्गत रस्ते मधून मौजा जांब, तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा येथे सन २०११-१२ मध्ये सिमेंट काँक्रीट रस्ता मंजूर झाला होता. सदरहू काम ग्रामपंचायत जांबमार्फत करण्यात आलेले आहे. प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मूल्यांकन ५,०४,६१८ झाले असून मर्यादित रक्कम ५,००,०००/- एवढी रक्कम ग्रामपंचायतीला अदा करण्यात आलेली आहे. सदरहू कामावर लेखा परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकापेक्षा जास्तीचा खर्च करण्यात आलेला नाही.

अंदाजपत्रकामध्ये एकूण ७ बाबी अंतर्भूत केलेल्या होत्या. सिमेंट रस्ता असल्याने व ग्रामपंचायतीच्या शिफारशीनुसार प्रत्यक्ष गावातील रस्त्याची बाब बघता लांबी पूर्ण करावयाची असल्याने त्यामध्ये स्टील नमूद असले तरी त्याचा वापर करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या बाजूला नाली असल्याने रस्त्यामधून वेस्ट एसडब्लूआर पाईप टाकण्याची आवश्यकता नसल्याने पाईप टाकण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे रस्त्याच्या बाजूला मुरुम सुद्धा टाकण्याची गरज भासली नाही, त्यामुळे रस्त्याची लांबी ग्रामपंचायत शिफारशीनुसार त्याच रस्त्याला लागून काम करण्यात आलेले आहे. सदरहू रस्त्यावर जास्तीचा खर्च करण्यात आलेला नाही. सदरहू रस्त्यावर ग्रामपंचायतीनी विस्तृत माहिती दर्शविणारा फलक ग्रामपंचायत फंडातून लावण्यात आलेला आहे. त्यामुळे सदरहू बाब मधील रक्कम ही मोजमाप पुस्तिकामध्ये लिहिण्यात आलेली नाही. त्यामुळे जास्तीचा खर्च झाला आहे असे म्हणता येणार नाही. रॉयल्टीची रक्कम रुपये ११,८०७/- चालान क्र. ०४ दिनांक २८ डिसेंबर, २०१७ अन्वये शासन खाती जमा करण्यात आलेली आहे. चलनाची छायांकित प्रत संलग्न आहे.

सदर देयकातून कपात करण्यात आलेले वॅट रुपये २५,०००/- विमा रुपये ५,०००/-, उपकर रुपये ५,०००/- कपातीच्या रक्कमा संबंधित कार्यालयात जमा करण्यात आल्या असून त्याबाबतच्या पोचपावत्याची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

सदरहू कामाची तपासणी उप अभियंता यांनी १०% व कार्यकारी अभियंता यांनी ५% केल्याचे प्रतिस्वाक्षरी मोजमाप पुस्तिकेत असल्याची खात्री करण्यात आलेली आहे.

पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावर जंगम मालमत्ता नोंदवहीत नोंदी अद्यायावत असून याबाबतची पूर्णतः खात्री करण्यात आलेली आहे. नोंदवह्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

**(५) परिच्छेद क्रमांक ४.४०२/७१८ (सन २०१२-१३)**

**अंगणवाडी बांधकामावर नियमबाह्य खर्च करणेबाबत**

पंचायत समिती, तुमसर जि.भंडारा सन २०१२-१३ (परिच्छेद क्रमांक ३) पंचायत समिती, तुमसर यांनी वरील योजनेवर रुपये ५१,२५,६२५/- इतका खर्च केला आहे. यावर अभिप्राय खालीलप्रमाणे :—

(१) जिल्हा वार्षिक योजनांअतर्गत भंडारा जिल्ह्यातील सर्व पंचायत समितींना एकूण १०० अंगणवाडी बांधकामाकरिता प्रत्येकी रुपये ४,००,००० प्रमाणे रु. ४,००,००,००० अनुदान जिल्हाधिकारी भंडारा यांचे पत्र क्र.जिनिस/का २/जिवायो १०/११२९३/११ दिनांक १४ मार्च, २०११ व जिनिस/का.२/जिवायो/१०-११/३८१/११, दिनांक २४ मार्च, २०११ अन्वये सन २०१०-११ या वित्तीय वर्षासाठी उपलेखा शिर्ष २२३६ १३५५ (३१) अंतर्गत मंजूर झालेले आहे. सदर बांधकामे सन २०१०-११ व सन २०११-१२ मध्ये होणे आवश्यक असताना पूर्ण झालेली नाही.

(२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १००२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जुलै, २००८ नुसार पुढील एका आर्थिक वर्षासाठी अखर्चित राहिलेला निधी शासनास परत करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करता सन २०१२-१३ वित्तीय वर्षात अंगणवाडी बांधकामावर अखर्चित रक्कम रुपये ५१,२५,६२५/- नियमबाह्य करण्यात आला.

(३) पंचायत समिती अंतर्गत वित्त विभागाने सदर बांधकामाबाबत मोजमाप पुस्तिका कामाचे प्राकलन करारनामा, नस्ती व आवश्यक अभिलेखे लेखापरीक्षणास सादर केली नाही व अर्धसमास पत्र क्रमांक ४३ दिनांक १६ सप्टेंबर, २०१३ अन्वये देयके पारित करण्याबाबतचा खुलासा व खर्च करण्याबाबत खुलासा सादर केला नाही.

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—

(१) सन २०१०-११ मध्ये मंजूर झालेली अंगणवाडी बांधकामे सन २०११-१२ अखेर पूर्ण होऊ शकली नाही म्हणून सन २०१२-१३ मध्ये सदर बांधकामे पूर्ण करून रक्कम अदा केली आहे.

(२) सदर बांधकामे ही अत्यावश्यक असल्यामुळे कार्यारंभ आदेश हे सन २०१०-११ मध्ये देण्यात आलेले असून कामे पूर्ण होण्यास विलंब झाल्याने विहित मुदतीत देयके अदा होऊ शकली नाही. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांचे पत्र क्र.३०९९ दिनांक १२ सप्टेंबर, २०१२ नुसार सदर अखर्चित रक्कम सन २०१२-१३ मध्ये खर्च करण्यास मान्यता मागितली होती. सदर मान्यतेच्या अधिन राहून खर्च करण्यात आलेला आहे. तसेच शासनाने दिनांक ३० जानेवारी, २०१६ नुसार खर्च करण्यास मान्यता दिली आहे.

(३) पंचायत समिती अंतर्गत सदर बांधकामाबाबत मोजमाप पुस्तिका, कामाचे प्राकलन, करारनामा नस्ती व आवश्यक अभिलेखे बांधकाम विभाग पंचायत समिती, तुमसर यांचेकडून देयके तयार करण्यात येऊन नस्तीसह त्यांचे विभागाकडून पडताळणी करून वित्त विभागास सादर करण्यात येते व देयके अदा झाल्यानंतर सर्व अभिलेखे मुळ विभागाला परत केली जातात. लेखा विभागास परिपूर्ण आलेल्या देयकामुळे व उपलब्ध अनुदानामुळे तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी सदर निधी खर्च करण्यास शासनाची परवानगी मागितल्याचे अधिन राहून तपासणी करून देयके पारित करण्यात आलेली आहे. लेखा विभागाचे कॅशबुक व पारित देयके त्यांचे उपलब्ध असल्यामुळे लेखा परिक्षणास दाखविण्यात आली.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(६) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (११) (सन २०१२-१३)**

पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरूप | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ६३ | अभिलेख सादर न करणे | भंडारा | मोहाडी | ११ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेटाळा येथील लिपिक निलंबित असल्यामुळे वेळेवर लेखा उपलब्ध करू शकले नाही. परंतु लेखा परिक्षणाच्या वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील दुस-या कर्मचा-यांनी लेखे सादर केले होते. परंतु लेखा परिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ते देऊ शकले नाही. त्यामुळे लेखा परिक्षण झाले नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र बेटाळा येथील लेखे अद्यावत असून लेखा परिक्षण करण्याकरिता लेखा परिक्षक कार्यालयास पत्र क्र.पंसमो/लेखा/सलेअ/४०५५/२०१७ दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ अन्वये कळविण्यात आले आहे व तशा सूचना वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेटाळा यांना देण्यात आलेल्या आहेत.

**(७) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (१७) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समिती यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशाच प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, भंडारा आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सदर लेखा परिच्छेदाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :—

सन २०१२-१३ चे स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना संबंधित कार्यालयाचे कनिष्ठ सहायक हे गैरहजर असल्यामुळे अभिलेखे लेखा परिक्षणास सादर करता आले नाही. त्या कारणास्तव त्यांना निलंबित करण्यात आले होते. सन २०१२-१३ चे लेखा परिक्षा भंडारा यांना या कार्यालयाचे पत्र क्र.७१६३ दिनांक २६ डिसेंबर, २०१७ अन्वये विनंती करण्यात आली असून लेखा परिक्षणाची

तारीख कळविण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तारीख प्राप्त होताच संपूर्ण अभिलेख लेखा परिक्षणास सादर करण्यात येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(८) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (१९) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समिती यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात.

अशाच प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, भंडारा आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समिती यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणास घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सदर लेखा परिच्छेदाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :—

सन २०१२-१३ चे स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना संबंधित कार्यालयाचे कनिष्ठ सहायक हे आजारी असल्यामुळे सन २०१२-१३ चे अभिलेखे लेखा परिक्षणास सादर करता आले नाही. सन २०१२-१३ चे लेखापरीक्षण करण्याकरिता मा.सहायक संचालक, स्थानिक निधी परिक्षण लेखा भंडारा यांना मुख्याध्यापक जिल्हा परिषद हायस्कूल, मिटेवाननी यांचे पत्र क्र.२२८, दिनांक १० जून, २०१४ अन्वये लेखा परिक्षणाची तारीख देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. सदर सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षणाचे तारीख प्राप्त होताच संपूर्ण दस्ताऐवज लेखा परिक्षणास सादर करण्यात येऊन लेखा परिक्षण करण्यात येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(९) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२४) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समिती यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशाच प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, भंडारा आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समिती यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणास घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

लेखा परिच्छेदात घेतलेल्या आक्षेपानुसार श्री.सी.एस. लांजेवार, वरिष्ठ सहायक यांचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१३ ला अपघात

झाल्यामुळे ते चौधरी हॉस्पीटल, नागपूर येथे दिनांक २५ ऑगस्ट, २०१३ ते दिनांक २० सप्टेंबर, २०१३ पर्यंत दवाखान्यात भरती होते. ते कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०१४ ला रुजू झाल्यामुळे पेंशनचे दस्ताऐवज लेखा परिक्षणास सादर करता आले नाही. आपण तारीख दिल्यास त्या दिवशी संपूर्ण दस्ताऐवज उपलब्ध करण्यात येईल. त्यासंबंधाने या कार्यालयाचे पत्र दिनांक १९ डिसेंबर, २०१७ अन्वये लेखा परिक्षणाची तारीख देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. सदर २०१२-१३ च्या लेखापरीक्षणाचे तारीख प्राप्त होताच संपूर्ण दस्ताऐवज लेखा परिक्षणास सादर करण्यात येऊन लेखा परिक्षण करण्यात येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**(१०) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३५) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समिती यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/ पंचायत समिती यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते, त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशाच प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद, भंडारा आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊन सुद्धा लेखापरीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समिती यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणास घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ५९ | भंडारा | भंडारा | ३५ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सदर लेखा परिच्छेदाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :—

सन २०१२-१३ स्थानिक निधी लेखापरीक्षण सुरू असताना फिरोज प्राथमिक शाळा भंडारा येथील मुख्याध्यापिका यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१३ ला अपघात झाल्यामुळे त्या वैद्यकीय रजेवर होत्या व त्यांच्याकडे सदर योजनेचे काम व दस्ताऐवज असल्यामुळे अभिलेखे लेखा परिक्षणास सादर करता आले नाही.

सन २०१२-१३ चे लेखा परिक्षण करण्याकरिता उपरोक्त अभिलेखे शाळेत उपलब्ध असून मा.सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, भंडारा यांना या कार्यालयाचे पत्र क्र. ८१३ दिनांक २७ डिसेंबर, २०१७ अन्वये लेखा परिक्षण करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. तारीख प्राप्त होताच संपूर्ण अभिलेख लेखा परिक्षणास सादर करण्यात येतील.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य करून सदर परिच्छेद वगळण्याबाबत विनंती करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ जून, २०१९ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, नियमित लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न केल्यामुळे वित्त विभागाकडून लेखापरीक्षण करून घेण्यासाठी वित्त विभागास कधी कळविले होते तसेच अधिकारी लेखापरिक्षकांना उत्तरे देत नाहीत, लेखापरीक्षणासाठी अभिलेखे दाखविलेले नाहीत. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र, बेटाळा यांच्या अंतर्गत लेखापरीक्षण केले आहे का, यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी खुलासा केला की, लिपिक निलंबित होते, त्यामुळे दुस-या कर्मचा-याने कागदपत्रे दाखविली होती. यावर समितीने विचारणा केली की, उत्तरात असे सांगितले आहे की, लेखापरिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ते देऊ शकले नाहीत, त्यामुळे लेखापरीक्षण झाले नाही. जिल्हा परिषदेने हे कबूल केले आहे. गंभीर बाब आहे.

यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी खुलासा केला की, त्या कालावधीत कनिष्ठ सहायक निलंबित झाले होते. निलंबनामुळे संबंधित आरोग्य सहायकांना पदभार दिला होता. त्यांना समजले नाही. त्यामुळे त्यांना ती कागदपत्रे दाखविता आली नव्हती. यावर समितीने विचारणा केली की, आरोग्य सहायकास पदभार दिला होता. याबाबत वरिष्ठांना कळविले होते का, यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी नकारात्मक उत्तर दिले. तद्नंतर समितीने विचारणा केली की, तत्कालीन गट विकास अधिकारी कोण होते, यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी खुलासा केला की, तत्कालिन गटविकास अधिकारी निवृत्त झाले आहेत.

यानंतर समितीने मत व्यक्त करून निदेश दिले की, बरीच कामे आहेत. अ.क्र. १७ पंचायत समिती मोहाडी, अ.क्र.१८ पंचायत समिती तुमसर, अ.क्र. १९ पंचायत समिती तुमसर, अ.क्र. २० पंचायत समिती तुमसर, अ.क्र. २१ पंचायत समिती भंडारा लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे या संदर्भातील आहेत, यामध्ये अनियमितता आहे. परिच्छेद क्रमांक ४.४३७(५९)/११ व ४.४३७(५९)/१७ हे दोन्ही एकाच तत्कालीन गट विकास अधिका-यांच्या संदर्भातील आहेत. त्यांना निरोप देऊनही ते आलेले नाहीत. त्यांच्या संदर्भात अजुनही काही तक्रारी आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची शासनाला शिफारस केली आहे. निवृत्त झाले म्हणजे जबाबदारी संपली असे होऊ शकत नाही. ४ वर्षे कारवाई करता येते. त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू आहे. ग्रामविकास विभागानेही कारवाई केली आहे. त्यांनी घरकुल लाभार्थ्यांचे पैसे परत केले आहेत. ते लाभार्थी निधीपासून वंचित राहिले आहेत. शासनाने निर्णय घेतला आहे की, लाभार्थ्यांना पैसे द्यावेत आणि तत्कालीन गट विकास अधिका-यांवर कारवाई करावी. समितीने हे दोन्ही आक्षेप गंभीरपणे घ्यावेत. त्यांच्या संदर्भात असलेल्या तक्रारींबाबत कारवाई प्रलंबित आहे, ती पूर्ण करावी व संबंधितांच्या निवृत्तीवेतनातून वसूली करून मुख्य कार्यकारी अधिका-यांनी अहवाल पाठविण्यात यावा.

तसेच अ.क्र. १७ ते २१ असे परिच्छेद असून, त्यामध्ये लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे असे आक्षेप आहेत. तत्संदर्भात महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम ७ अन्वये दोषी असल्यास संबंधितांवर २५ हजार रुपये दंड लावणे, वेतनवाढ रोखणे व सेवापुस्तिकेत नोंद घेणे अशी कारवाई करावी. तत्कालीन गट विकास अधिका-यांवर याच कालावधीतील आक्षेप आहेत. ते सेवानिवृत्त झाले आहेत. मात्र त्यांचे आक्षेप याच कालावधीतील आहेत. लाभार्थ्यांचे पैसे कोठून भरून देणार, घरकुलांच्या लाभार्थ्यांना पैसे देण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत आणि तत्कालीन गट विकास अधिका-यांवर कारवाई करण्याची शिफारस केली आहे. गट विकास अधिका-यांच्या संदर्भातील आक्षेपांची प्रकरणे भंडारा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत घडलेली आहेत. त्यामुळे त्या गट विकास अधिका-यांवर सर्व कारवाई प्रस्तावित कराव्यात, त्यांच्या निवृत्तीवेतनातून वसूली करावी आणि तत्संदर्भात सखोल तपासणी करून अहवाल तयार करून समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, त्या गट विकास अधिका-यांचे नाव काय आहे, त्यांना समितीच्या बैठकीसंदर्भातील निरोप देण्यात आला नव्हता का, यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी समितीस नकारात्मक उत्तर दिले. तत्कालीन गट विकास अधिका-यांचे नाव श्री. शांतराम पांडुरंग चाफले असे आहे. समितीने पुढे विचारणा केली की, परिच्छेद क्रमांक ४.४३७(५९)/१७/तुमसर या संदर्भात एक प्रश्न आहे. संबंधित कनिष्ठ सहायकास निलंबित केले आहे, तत्संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अभिलेखे सादर केले नाहीत म्हणून निलंबित केले आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, त्यासाठी निलंबित करता येत नाही. तत्संदर्भातील चार्जशीट समितीस दाखवावी. अभिलेखे सादर केले नाहीत म्हणून निलंबित होत नाही. यावर गटविकास अधिकारी, तुमसर यांनी खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्र, गोबरवाही संदर्भात लेखे सादर न केल्यामुळे श्री. अमित वैद्य, कनिष्ठ सहायक यांना निलंबित केले होते.

यावर समितीने निदेश दिले की, असे असेल तर मग इतर सर्व प्रकरणांत अशी कारवाई का केली नाही, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी तपासणी करून समितीच्या पुढील बैठकीच्यावेळी अहवाल सादर करावा. यांना निलंबित केले तर मग इतरांना का केले नाही याचेही उत्तर देण्यात यावे. समितीने निलंबित करण्यास सांगितले नव्हते. सदर विषयाच्या संदर्भातील सविस्तर अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

(१) जिल्हा परिषदेअंतर्गत गट विकास अधिका-यांच्या संदर्भातील आक्षेपाच्या प्रस्तावित प्रकरणाबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधित गट विकास अधिका-यांच्या निवृत्ती वेतनातून वसूली करण्यात आली आहे काय, असल्यास तपासणी अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

(२) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्र उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची व एक वेतनवाढ रोखून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करण्यात यावी.

(३) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होऊ नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्यासंदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

(४) संबंधित अधिनियमात दुरुस्ती करून रुपये ५०,०००/- दंड अथवा परिच्छेदातील एकूण रक्कमेच्या १०% इतकी रक्कम दंड म्हणून आकाराण्याची तरतूद करण्याची वित्त विभाग कारवाई करेल काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

(१) पंचायत समिती मोहाडी अंतर्गत लेखा परिक्षणाकरीता अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत परिच्छेद क्र.४.४३७/७३४ प्रकरणी श्री. शांताराम चाफले तत्कालिन गट विकास अधिकारी, पंचायत समिती मोहाडी यांचे विरुद्ध दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त नागपूर याना पत्र क्र.१००७/१९ दिनांक २१ जानेवारी, २०१९ अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

तसेच जिल्हा परिषद भंडारा येथे पंचायती राज समितीच्या दिनांक ०१ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या बैठकीमध्ये उपस्थित झालेल्या मुद्यामध्ये पंचायत समिती, मोहाडी येथील सेवानिवृत्त झालेल्या तत्कालिन गट विकास अधिकारी यांनी नैसर्गिक आपत्ती अंतर्गत मंजूरी प्राप्त लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध न करून दिल्याबाबत चौकशी करण्यांत आली असून सदर प्रकरणी तत्कालिन प्रभारी गट विकास अधिकारी, श्री. एस. पी. चाफले व श्री. तांडेकर तत्कालिन कनिष्ठ आरेखक हे दोषी आढळले. प्रत्यक्षात पंचायत समितीचे खात्यामध्ये अनुदान उपलब्ध असतांना सुद्धा त्यांनी दुर्लक्ष केल्याने दोन्ही लाभार्थ्यांनी घरकुल बांधकाम पूर्ण करूनही अनुदान उपलब्ध करून दिले नाही. नस्ती हाताळणारे श्री.तांडेकर हे मृत पावले आहे व तत्कालिन प्रभारी गट विकास अधिकारी, श्री. चाफले हे दिनांक ३१ मार्च, २०१८ ला सेवानिवृत्त झाले असून सदर प्रकरणी त्यांना दिनांक ३१ जुलै, २०१७ ला खुलासा विचारण्यात आला. परंतु खुलासा समाधानकारक नसल्याने त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी चा प्रस्ताव १ ते ४ जोडपत्रासह दिनांक २२ जानेवारी, २०१९ रोजी मा.आयुक्त, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) मुंबई स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० मधील कलम ७ (सुधारीत अधिनियम २०११ मधील कलम ८) नुसार लेखा परिक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झाल्यास दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३७/कोषा-प्रशा-४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ नुसार विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

तथापि, सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध न करून देणा-या अधिकारी, कर्मचा-याविरुद्ध पंचायत राज समितीने दिलेल्या निर्देशनानुसार परिच्छेद निहाय खालील नमूद कर्मचा-यांविरुद्ध दंडात्मक कार्यवाहीचा प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे पत्र क्र. १००७ दिनांक २१ जानेवारी, २०१९ अन्वये सादर करण्यात आलेला आहे.

| परिच्छेद क्रमांक | जबाबदार अधिकारी, कर्मचारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|
| ३.६७५/३५० | श्री. ए. एन. शेंडे, विस्तार अधिकारी. (कृषि), कृषि विभाग |
| ३.६७६/३५१ | श्री. एस. एन. गायधने, तत्कालिन कृषि अधिकारी, पंचायत समिती, तुमसर |
| ३.१०६९/५३१ | श्री. एस. के. गायधने, कनिष्ठ सहायक |
| ४.१८२/६१८ | श्री. आर. ए. कावळे, सेवानिवृत्त ग्राम विस्तार अधिकारी |
| ४.४०२/७१८ | श्री. के. टी. मडकाम, शाखा अभियंता |
| ४.४३७/७३४ | श्री. ए. एस. बावनकुळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक<br>श्री. एस. एन. बुराडे, कनिष्ठ सहायक |
| ४.४३७/७३४ | श्री. शांताराम चाफले, तत्कालिन गटविकास अधिकारी |
| ४.४३७/७३४ | श्री. बा. आर. राऊत, तत्कालिन कनिष्ठ सहायक प्राथमिक आरोग्य केंद्र, बेटाळा |
| ४.४३७/७३४ | कु. फिरोज संदल बेग मिर्झा, मुख्याध्यापिका |
| ४.४३७/७३४ | श्री. अमित वैद्य, कनिष्ठ सहायक यांची कार्यालयीन आदेश क्र.२४०५/१५ दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये एक वार्षिक वेतनवाढ कायमस्वरूपी थोपिविणे व निलंबन कालावधी निलंबन काळ म्हणून समजण्यात येते. अशी शिक्षा ठोठावण्यात आलेली आहे. |

सबब अनुपालन अहवाल मान्यतेस्तव सादर.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**(१) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय.——** (वित्त-७) लेखापरीक्षणाकरीता अभिलेखे उपलब्ध करून न दिल्याबाबत जिल्हा परिषद, भंडारा यांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत.

तत्कालिन प्रभारी गट विकास अधिकारी, श्री. एस. पी. चाफले यांच्याविरुद्ध करण्यात येत असलेली विभागीय चौकशीची बाब या विभागाशी संबंधित नसून पशुसंवर्धन विभागाशी संबंधित आहे.

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे अभिप्राय :-**

डॉ. चाफले, तत्कालिन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहाडी जिल्हा भंडारा (अतिरिक्त कार्यभार) तथा पशुधन विकास अधिकारी (गट-अ) (विस्तार), पंचायत समिती मोहाडी, यांच्या विरुद्ध विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम, २७ (२) ब, बाबत सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार प्रकरण वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यास्तव दिनांक १४ मार्च, २०१९ रोजी सादर करण्यात आले असून सदर प्रकरणी वित्त विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय : (वित्त-७)**

(२) महाराष्ट्र स्थानिक लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर करण्यात येते.

(३) महालेखापाल व स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्यासाठी नोडल ऑफीसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र. लेखाप-२०१३/(७/९३) वित्त-८ दिनांक ११ जानेवारी, २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने भंडारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक ११ जून, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, या पदावर असलेले कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. त्यांचा मूळ विभाग पशुसंवर्धन विकास विभाग होता. परंतु त्यांच्याकडून खुलासा घेण्यात आलेला आहे. त्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव सेवानिवृत्त होण्यापूर्वी सादर करण्यात आलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, विभागीय चौकशीचे पुढे काय झाले, संबंधिताला पेंशन तर मंजूर झालेली आहे. आता विभाग कोणती कार्यवाही करणार आहे, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत काही प्रमाणात पेंशन मिळण्याचा अधिकार असतो.

यावर समितीने विचारणा केली की, आता हे प्रकरण किती दिवस प्रलंबित राहील, विभागीय चौकशी फायनल केली पाहिजे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सध्या यासंदर्भात आयुक्त कार्यालयातील चौकशी अधिकारी चौकशी करीत आहेत. तद्नंतर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, दिनांक २२ जानेवारी रोजी त्यांनी पत्र पाठविलेले आहे. विभागीय चौकशी फायनल करणे त्या कर्मचा-यासाठीही चांगले आहे. परंतु त्यांना फायनल पेंशन मिळत नसेल.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सूट मिळत गेल्यावर असे काम करणा-यांची हिंम्मत वाढते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सेवानिवृत्त झाल्यानंतर विभागीय चौकशी चालू असणे, केवळ तात्पुरते सेवानिवृत्ति वेतन मंजूर होणे आणि नियमित सेवानिवृत्ती वेतन बाकी असणे, ही मोठी शिक्षा मानली जाते. यावर समितीने मत व्यक्त केले की, समितीस वाटते त्यांना अंतिम सेवानिवृत्ती वेतन चालू झालेली आहे. विभागीय चौकशीमध्ये दोषी आढळून आल्यानंतरही निर्दोष सोडले जाते. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, कोणी दोषी आढळून आल्यावर त्याला निर्दोष सोडणे शक्य नाही. तसे होत नाही. हा विषय पंचायती राज समितीच्या साक्षीमध्ये उपस्थित झाल्याची बाब लक्षात घेऊन या प्रकरणासंदर्भात तातडीने स्मरणपत्र देण्यात येईल, असे समितीला प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी आश्वस्त केले. यावर समितीने याबाबत लवकरात लवकर चौकशी पूर्ण करावी व संबंधितांवर कार्यवाही करावी असे निदेश दिले. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.

यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या सर्व विषयाची चौकशी करून विभागीय आयुक्तांकडे ही प्रकरणे सुरू केली आहेत. अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार त्यांची चौकशी होऊन विभागीय आयुक्तांकडून दंडाचे आदेश होते. ते आता लवकरच पूर्ण होईल.

यावर समितीने निदेश दिले की, कनिष्ठ सहायकांनी कागदपत्रे उपलब्ध केली नाही, असे सांगितले आहे याचा अर्थ काय आहे, कोणत्या तारखेला लेखापरीक्षण होणार आहे याची पूर्वसूचना सर्व खातेप्रमुखांना देण्यात येते. त्यामुळे त्या खातेप्रमुखांची जबाबदारी आहे की, कनिष्ठ सहायकांकडून सर्व कागदपत्रे उपलब्ध करून घ्यायची. किंवा त्यांनी त्या दिवशीच्या दरम्यान कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीतर कारवाई करा. पंचायती राज समिती समोर मुद्दा आल्यानंतर कार्यालय प्रमुखांना सोडून कनिष्ठ सहायकांवर कारवाई करीत आहात. यासाठी कनिष्ठ सहायक कसे जबाबदार असतील. तसेच कनिष्ठ सहायकाचे प्रकरण पुन्हा तपासून घ्यावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने सदर प्रकरण तपासून त्या संदर्भातील अहवाल पाठविलेला आहे. त्यामुळे आता तो अहवाल जिल्हा परिषदेला मागे घेता येणार नाही. यास समितीने मान्यता दिली.

**अभिप्राय व शिफारशी**

भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-१३ मधील एकूण १० परिच्छेदांमध्ये लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये लेखापरीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आले नसल्याचे दिसून आले. त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न दिल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

**समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, लेखापरिक्षकांना संबंधित अधिका-यांकडून अभिलेखे वेळीच उपलब्ध करून दिली जात नाहीत. त्यामुळे लेखापरीक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, "जी कोणतीही व्यक्ती महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिध्द झाल्यानंतर लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रक्कमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणा-या रक्कमे इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच त्यांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी" अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात कळविण्यात यावी.**

**ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे, याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही त्याप्रकरणामध्ये नियमानुसार दंड आकारणी करण्यात यावी. समितीने जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. भंडारा जिल्हा परिषदेमध्ये सन २०१२-१३ या वर्षामध्ये एकूण १० परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ६ मधील पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसूल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल समितीला दोन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, भंडारा

**सर्वसाधारण शिफारशी**

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः भंडारा जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसूलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधीची तरतूद करून मिळविला जातो मात्र असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती देखीलजमा केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रक्कम वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमेवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून भंडारा जिल्हा परिषदेमधील रकमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसूली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखापरिच्छेदांमध्ये लेखापरिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखापरीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे**

**उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरूवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रुपये २५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भंडारा जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कारवाई केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कारवाई केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक १ ऑगस्ट २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(३) श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**जिल्हा परिषद पदाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा :**

१. श्री. रमेश डोंगरे, अध्यक्ष

२. श्री. विवेकानंद कुर्झेकर, उपाध्यक्ष

३. श्री. प्रेमदास वनवे, सभापती, बांधकाम व आरोग्य समिती

४. श्री. धनेंद्र तुरकर, सभापती, शिक्षण व अर्थ समिती

५. श्रीमती विशाखा बांडेबुचे, सभापती, पंचायत समिती, मोहाडी

६. श्रीमती रोशना नारनारे, सभापती, पंचायत समिती, तुमसर

७. श्रीमती उषा डोंगरवार, सभापती, पंचायत समिती, साकोली

८. श्रीमती मंगला प्रदिप बगमारे, सभापती, पंचायत समिती, लाखांदूर

९. श्रीमती रेखा ठाकरे, सभापती, महिला व बालकल्याण समिती

१०. श्रीमती रेखा वाजबिड, सभापती समाजकल्याण समिती

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. अरुणकुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर विभाग**

श्री. अनिल किटे, सह आयुक्त (तपासणी), आयुक्त कार्यालय, नागपूर

**जिल्हा परिषद, भंडारा**

१. श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

२. श्री. अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

३. श्रीमती मंजुषा ठक्कर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

४. श्रीमती कुरसंगे, महिला व बालकल्याण अधिकारी तथा प्रकल्प संचालक

५. डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

६. श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

७. श्री. डी. पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

८. श्री. स. नु. यादव, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग

९. श्री. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

१०. श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

११. श्री. व्ही. के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

१२. डॉ. एन. एच. फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

१३. श्री. मो. भी. मैदमवार, कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

१४. श्री. आ. एम. दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

१५. श्री. एम. जी. डाबरे, कृषि विकास अधिकारी

१६. श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

१७. श्रीमती नुतन सावंत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा

१८. श्रीमती अनिता तेलंग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

१९. श्री. के. के. ब्राम्हणकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

२०. श्री. सुनिल तडस, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

२१. श्री. देविदास देवरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

२२. श्री. प्रकाश निर्वाण, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

२३. श्री. रविंद्र वंजारी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३च्या लेखा पुनर्विलोकन अहवालातील भंडारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २ ऑगस्ट २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(६) श्री.किशोर पाटील, वि.स.स.

(७) श्री.तुकाराम काते, वि.स.स.

(८) श्री राहूल बोंद्रे, वि.स.स.

(९) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(११) श्री . विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रक सदस्य** :

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग मंत्रालय

(२) श्री. अरूण कुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग मंत्रालय

**जिल्हा परिषद,भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अ. बा.मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्रीमती मंजुषा ठक्कर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्रीमती मनिषा कुरसंगे, महिला व बालविकास अधिकारी तथा प्रकल्प संचालक

(५) डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी प्राथमिक

(७) श्री. डी. पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता)

(शा.म.मु.) एचबी २४३५—७ (४५०—३–२०२१)

(८) श्री. स. नु. यादव, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री. ए. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. व्ही. के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१२) डॉ. एन. एच. फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१३) श्री. मो. भी. मैदमवार, कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

(१४) श्री. आ. एम. दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

(१५) श्री. एम. जी. डाबरे, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(१७) श्रीमती नुतन सावंत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा

(१८) श्रीमती अनिता तेलंग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

(१९) श्री. के. के. ब्राम्हणकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

(२०) श्री. सुनिल तडस, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

(२१) श्री. देविदास देवरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

(२२) श्री. प्रकाश निर्वाण, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

(२३) श्री. रविंद्र वंजारी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा पुर्नविलोकन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद, भंडारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(७) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(९) श्री. राहूल बोंद्रे, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१२) श्री . विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रक सदस्य**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. हरिष तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :**

(१) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग मंत्रालय

(२) श्री. अरूण कुमार पवार, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग मंत्रालय

**जिल्हा परिषद, भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री अ. बा. मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकार

(३) श्रीमता मंजुषा ठक्कर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(४) श्रीमती मनिषा कुरसंगे, महिला व बालविकास अधिकारी तथा प्रकल्प संचालक

(५) डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. डी. पी. सपाटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(८) श्री. स. नु. यादव, कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग

(९) श्री. ए. पी. मुकटे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१०) श्री. प्र. वा. कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(११) श्री. व्ही. के. झिंगरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१२) डॉ. एन. एच. फुके, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१३) श्री. मो. भी. मैदमवार, कार्यकारी अभियंता, ग्रापापु विभाग

(१४) श्री. आ. एम. दिघे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मग्रारोहयो

(१५) श्री. एम. जी. डाबरे, कृषि विकास अधिकारी

(१६) श्री. रविंद्र कारोलकर, शिक्षणाधिकारी (निरंतर शिक्षण)

(१७) श्रीमती नुतन सावंत, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, भंडारा

(१८) श्रीमती अनिता तेलंग, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी

(१९) श्री. के.के.ब्राम्हणकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखनी

(२०) श्री. सुनिल तडस, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली

(२१) श्री. देविदास देवरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लाखांदूर

(२२) श्री. प्रकाश निर्वाण, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

(२३) श्री. रविंद्र वंजारी, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा पुर्नविलोकन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-१ संदर्भात भंडारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक ११ जून २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रक सदस्य**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, सहसचिव (२) (का)

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई,**

श्री. सुनिल भोसले, संचालक

**विभागीय सचिव :**

(१) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(२) डॉ. प्रदीप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(३) श्रीमती विनीता सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

(४) सुवर्णा खरात, सहसचिव, शालेय शिक्षण विभाग

(५) श्री. संतोष कुमार व्य.सं.म.ल.ड. महामंडळ

(६) श्री. म. र. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(७) श्री. कि. शां. परब, उप सचिव, जलसंपदा विभाग

(८) डॉ. विजय बुंदेवार, सहसंचालक, आरोग्यसेवा

(९) श्री. राजाराम माने, विभागीय आयुक्त नाशिक

(१०) श्री. यु. श्रीरंगम, सचिव तथा मु.का.अ.महा इमारत व इतर बांधकाम मुंबई

(११) श्री. विजयकांत पानबुडे, अपर कामगार आयुक्त, नागपूर

(१२) श्री. पुंडलिक मिराशे, सहसचिव (तांत्रिक) म.प्र.नि.मंडळ

(१३) श्री. विजय कुमार कलवले, सहा.संचालक मृद व जलसंधारण

(१४) श्री. श. मा. साठे, उप सचिव कामगार विभाग

(१५) डॉ. प्रशांत उईके, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१६) श्री. रमेश चव्हाण, उप सचिव, महसूल विभाग

**जिल्हा परिषद, भंडारा :**

(१) श्री. रविंद्र जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अ.बा.मानकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(३) श्रीमती मंजुषा ठवकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. एल. एस. पाच्छापुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(५) डॉ. प्रशांत ऊईके, जिल्हा आरोग्य अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत :**

सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात भंडारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मृद व जलसंधारण विभाग सचिव, जलसंपदा विभाग, सहसचिव, महिला व बालविकास विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, भंडारा यांची साक्ष घेतली.

## बैठकीचे कार्यवृत्त

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti) ची बैठक बुधवार, दिनांक ३ मार्च २०२१ रोजी ३-०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.—

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत :**

समितीने बैठकीत पहिल्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.